# प्रफुल शेजव



# मला काही सांगाचंय

## भाग ५

ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करीत आहे

प्रफुल राजेंद्रराव शेजव

लिखित

सुपरहिट कादंबरी

# मला काही सांगाचंय...

## चा भाग 5

# मला काही सांगाचंय... भाग ५

हे पुस्तक विनामूल्य आहे

पण फ़ुकट नाही

या मागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत .

म्हणून हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिट

१ मिनिट : लेखकांना फ़ोन करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

असे न केल्यास यापुढे आपल्याला

पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.

दाम नाही मागत. मागत आहे दाद.

साद आहे आमची. हवा प्रतिसाद.

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत असावे. ज्यामुळे लेखकाला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यात मदत होते. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे आणि त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा, आणि संपूर्ण समाज सतत एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

# मला काही सांगाचंय... भाग 5 (कादंबरी)


## लेखक : प्रफुल राजेंद्रराव शेजव

शिक्षण : MBA

ई मेल : praful101shejao@gmail.com

मोबाईल नंबर : 8805967973

पत्ता : मु. पाळा ता. नांदगाव खंडेश्वर, जि. अमरावती



या पुस्तिकेतील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण व नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957 read with Sections 43 and 66 of the IT Act 2000. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author’s copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक--- ई साहित्य प्रतिष्ठान

www. esahity.com


esahity@gmail.com


प्रकाशन : ३१ ऑगस्ट २०२०


©esahity Pratishthan®2019


- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध
- आपले वाचून झाल्यावर आपण फॉरवर्ड करू शकता
- हे पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापूर्वी किंवा वाचना व्यातिरिक्त कोणताही वापर करण्यापूर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी आवश्यक आहे .

## आधीचे भाग वाचा... कव्हरवर क्लिक करा, पुस्तक उघडेल



# मला काही सांगाचंय...

## ( भाग पाच )

## अनुक्रमणिका :


४१. पुन्हा एकदा

४२. कारण

४३. अपेक्षाभंग

४४. अधीरता

४५. भूतकाळाचा स्पर्श

४६. अंकुर

४७. आशेचे किरणं

४८. नवा गडी, नवा राज्य

४९. सोनेरी क्षण - अनिरुध्द

५०. सोनेरी क्षण - सुजित

५१. सोनेरी क्षण - आर्यन

५२. सोनेरी क्षण - ऋतुराज

या कादंबरीतील सर्व स्थळे, व्यक्ती व घटना काल्पनिक असून त्यांचा कोणाही स्थळ, व्यक्ती वा घटनेशी प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष संबंध नाही. तसा तो आढळून आल्यास तो निव्वळ योगायोग समजावा.

## ४१. पुन्हा एकदा

जीवन जगत असतांना कित्येक अनुभव येतात, सुख दुःख, चांगली वाईट वेळ, विविध परिस्थिती बघायला मिळते... नात्यांची परीक्षा नियती घेत असते की काय कुणास ठाऊक? पण कधी कधी अशी वेळ हि येते की नेमकं काय करावं काही कळत नाही. जीवन म्हणजे एक प्रश्नचिन्ह, जीवन म्हणजे प्रत्येक वेळी नवनवीन कसोटी, जीवन म्हणजे फक्त जगणं कि मरणाची वाट बघत नुसतं श्वास घेत बसणं, जीवन म्हणजे एकमेकांना समजून घेण्याचं माध्यम कि जीवन म्हणजे एकमेकांना कधी समजून घ्यायला जमलंच नाही म्हणून एखादा विस्कटलेला हिशोब, ज्याची गोळाबेरीज करता करता नातं तुटत, मन तुटतात, कुणी कुणाला गमावून बसतं तर कुणी नुसतंच जे वाट्याला आलं ते स्वीकारून कसतरी जगायचं आहे म्हणून जगत राहायचं अस ठरवून घालवलेला वेळ म्हणजे जीवन!!!

तर स्मृतिभ्रंश झाल्याने कुमार जीवन नावाच्या पुस्तकाचे सारे पान कोरे अशी सद्यस्थिती, तो अपघातातून सुखरूप

वाचला... नवा जन्म त्याला मिळाला याच काही वेळेपुरते क्षणिक सुख त्याच्या आई वडील भाऊ, मित्रांना मिळालं. काही क्षणात सगळं परत हिरावून घेतलं, परिस्थिती नशिबाचा बहाणा घेऊन सगळ्यांची जणू परीक्षा घेत होती... पुन्हा एकदा ! आता काय होईल? काय करायचं कि आधीचा कुमार परतून येईल? हे प्रश्न समोरच आ वासून उभे राहिले..

सुजितने तिला फोन करून अशी बातमी दिली, आणि ती डायरी आठवणीने उद्या येतेवेळी सोबत आणायला तिला सांगितलं. त्याच्या मनात नवीन कल्पनेने जन्म घेतला आणि तसं करून पाहायला काहीएक हरकत नाही... योजना जर फलित झाली तर सगळ्यांना खूप आनंद होईल असा विचार करूनच त्याने ती कल्पना आर्यन, अनिरुध्द, ऋतुराजला सांगायचं ठरवलं .. त्यांना सुद्धा ती कल्पना पसंत पडणार, त्यावर अजून बोलणं आवश्यक आहे हे समजून ते सगळे जेवण केल्यावर जरावेळ शतपावली पण होईल आणि या विषयावर बोलणं सुध्दा म्हणून सगळे बाहेर पडले.. काहीवेळ ते नुसतेच चालत गेले, रात्रीचे १० वाजून गेलेले, गावात लवकरच लोक

झोपी जातात म्हणून बाहेर नीरव शांतता पसरली होती, वर आकाश निळं निळं, चंद्रकोर उमललेली आणि आजूबाजूला चांदण्यांची गर्दी झालेली, हवेची झुळूक आली की झाडांची पाने हलकेच हलत, मध्येच गावाच्या कोण्या एक कोपऱ्यातून कुत्रांच्या भुंकण्याचा आवाज आला की सगळे कुत्रे त्या आवाजाला जणू प्रतिसाद देऊन गाव डोक्यावर घेत... यांच्या मनात कुत्रे चावणार तर नाही ना आणि कुमारच्या जीवनात तर काहीतरी भलतंच सुरु झालं. एक अपघात आणि सगळं काही बदललं, आतापर्यंत जगलेलं आयुष्य तो पूर्णपणे विसरला, स्वतःच अस्तित्व हि तो विसरला, जिवापाड ज्या व्यक्तीवर त्याने प्रेम केलं तिला पण तो विसरला असेल का? तिच्या आठवणी मनात कुठेतरी तश्याच असतील? आई वडील, भाऊ, मित्र सगळं सगळं विसरून गेला, अगदी काही क्षणांत ! अस का व्हावं? का हे अस जगणं त्याच्या वाट्याला यावं? असे कित्येक प्रश्न सुजित, आर्यन, अनिरुध्द आणि ऋतुराज यांच्या मनात येत होते... काही अंतर असंच चालत चालत जाऊन ते एका झाडाच्या पारावर बसले. असं रात्रीच्या वेळी झाडाखाली ते पहिल्यांदाच एकत्र बसले, प्रत्येकाच्या मनात प्रश्न आणि विचारांची गर्दी दाटली एक वेळ अशी आली कि कुणीच काही

बोलत नव्हतं म्हणून ती शांतता असह्य झाली, आर्यनने बोलायला सुरुवात केली...

"सुजित, तुला जे सुचलं ते उपयोगी पडेल ना? ती कल्पना काम करेल ना?"

त्याच्या या प्रश्नाने शांतता भंग पावली आणि आता सुजित काय म्हणतो याकडे त्यांचं लक्ष लागलं... पण तो जरा शांत, विचारात मग्न झाला होता, बहुदा त्यानेसुध्दा फक्त कल्पना करून अस केलं तर परिस्थिती पूर्ववत होऊ शकते असा अंदाज लावला होता... कल्पना काय कोणती हि करता येईल पण त्यामुळे वास्तविकतेवर कल्पनेचा परिणाम होतो अस काही नाही पण कल्पना करून वास्तविकतेत काही बदल करता येतील आणि त्यामुळे वास्तव जरी पूर्णपणे बदलविता आले नाही पण प्रयत्न करून पाहिला इतकं तरी समाधान नक्कीच मिळते ना ! प्रयत्न केल्यावर तो यशस्वी होईल की नाही हा नंतरचा भाग आहे...

मग न राहवून अनिरुध्द’’बोल ना, सुजित, यांतून काही साध्य होईल की नाही..?’’

ऋतुराज एक नजर त्याच्याकडे बघून जणू हेच प्रश्न अबोल राहून विचारत होता... सुजितने नेमकं काय करायचं ? हे अजून सांगितलं नव्हतं फक्त एक कल्पना सुचली आहे जी आधीच सुचायला हवी होती बस् इतकंच तो बोलला होता आणि मग त्याने तिला फोन केला होता...

## ४२. कारण

सुजितने एक नजर आभाळाकडे पाहिले, हात एकावर एक ठेवून तो बोलायला लागला ,"दोस्तहो, मला ही कल्पना अशीच सुचली नाही त्यामागे कारण आहे... आपण सगळे मित्र आहोत, कुमार आपल्या सगळयांचा मित्र आहे... एकमेकांबद्दल आपल्याला तितकंच माहित आहे जे आपण आजवर बोललो आणि बरंचसं असं काही असेल जे एकमेकां बद्दल माहित नाही जसं कुमारची डायरी, डायरीचं गुपित कुणालाच माहित नव्हतं... अपघात झाला आणि ते गुपित उघड झालं सध्या फक्त मला माहित आहे, कारण मला ती डायरी वाचण्याची संधी मिळाली तर ती डायरी वाचून इतकं तरी कळलं की काही क्षण असे आहेत ज्यांचा कुमारला विसर पडणे शक्य नाही...."

"म्हणजे? तुला नेमकं काय म्हणायचं आहे?" ऋतुराज ने मध्येच प्रश्न विचारला...

आर्यन आणि अनिरुध्द ने मानेनेच दुजोरा दिला...

सुजित,”जे काही कुमारने डायरीत लिहून ठेवले ते तो पुन्हा एकदा नव्याने जगला आहे  जरी त्याला आज सगळ्या गोष्टींचा विसर पडला आहे, तो कुणाला ओळखत नाही पण ना डायरीत लिहिलेले ते अविस्मरणीय अनुभव, त्याच्या मनात कुठेतरी दडलेले आहे असं मला वाटतं. आपण जर त्याच्याशी बोलता बोलता त्या डायरीत लिहिलेलं त्याला रोज थोडं थोडं सांगितलं तर कदाचित त्याला हळूहळू आठवायला लागेल...”

“सुजित, डायरीत काय काय लिहिलं आहे ते फक्त तुला माहित आहे.... आम्ही कसं कुमारला सांगणार? आम्हाला कशी मदत करता येईल..?” अनिरुध्द ने विचारलं...

त्याच्याशी सहमत होऊन आर्यन आणि ऋतुराज ने हि हातानेच इशारा करत पुन्हा विचारलं की कसं करायचं?

तेव्हा सुजित म्हणाला,"तुम्ही त्याची काहीही काळजी करू नका मी तिच्याशी फोनवर तसं बोललो कि उद्या येतेवेळी नक्की डायरी सोबत आण... कुमार बद्द्ल हि तिला सांगितलं.."

"मग ती काय म्हणाली?"जवळ जवळ तिघांनी हि एकसाथ प्रश्न केला...

"ती उद्या सकाळी येणार आहे आणि डायरी पण सोबत आणणार आहे.." सुजित म्हणाला..

दोन एक मिनिट ते शांत झाले, अस खरंच होऊ शकत का जरा विचार करून त्यांना हि कल्पना काम करेल असं वाटलं, सुजितने जे सांगितलं ते सुध्दा पटलं... कुमारला त्याच्या बद्दल थोडं थोडं सांगितलं तर त्याच्या स्मृती जागी होऊन तो नक्कीच परतून येईल हा विश्वास मनात पक्का झाला....

सुजितला हात मिळवून त्याला हि कल्पना सुचली याकरीता त्यांनी अभिनंदन केले.

इतक्यात अनिरुध्द,”मी काय म्हणत होतो की आपल्याला आधी या बाबतीत डॉक्टरशी बोलावं लागणार, असं करणं योग्य आहे की नाही.?”

आर्यन ने त्यावर संमती देत,”अरे हो, अनिरुध्द चं बरोबर आहे कारण नुकतंच कुमारचं ऑपरेशन झालं आहे, त्याला जुन्या आठवणी सांगताना त्रास तर होणार नाही..”

“हो हो, एकदा डॉक्टरला भेटून सल्ला घेणे आवश्यक आहे, एक अजून कुणालाच डायरीबद्दल कळू द्यायचं नाहीये, डॉक्टरला पण फक्त इतकंच सांगू कि कुमारला भेटल्यावर त्याच्या सोबत असतांना जे काय झालं आणि आमच्या सोबतच्या जुन्या आठवणी ते त्याला परत सांगून आठवायला मदत करु अस बोलू...”ऋतुराज ने सुचवलं

सर्वांना त्याच मत पटलं, मग बोलत बोलत ते घरी जायला निघाले.. रात्रीचे जवळपास ११:३० वाजले, येतेवेळी हळू हळू चालणारे पाय आता परत जाताना जलद झाले, आकाशात चंद्रकोर आणखीच उठून दिसायला लागली, सोबतीला असणाऱ्या चांदण्या जास्त लुकलुकायला लागल्या... जरा वारा सुटला , सगळीकडे शांतता पसरली, सारं गावं निजलं ... मध्येच वाऱ्याचा वेग वाढला की पानांचा सळसळ अस आवाज झाला अन शांतता भंग पावली ... ती अशांतता कायम ठेवयाची म्हणून कुत्र्यांनी भुंकून आणखी त्यात भर टाकली... काही वेळातच ते घरी पोहोचले, प्रशांत बाहेर अंगणातच टाकलेल्या बिछान्यावर झोपला होता, ती माउली त्याच्या उश्याशी बसून त्याच्या डोक्यावरून हात फिरवत बसली होती, त्यांना परतून आलेलं बघून तिला परत कुमारचा चेहरा नजरेसमोर दिसला आणि डॉक्टरांचे ते शब्दसुद्धा आठवले अन टचकन तिच्या डोळयात पाणी आलं... आसवं पापण्यांवरून खाली ओघळताच तिने लगेच पदराने पुसले, ती माउली व्याकुळ मनाला सांभाळत उठून घरात

गेली, भावनेचा ओघ काहीवेळ तसाच राहिला, ओल्या पापण्या मिटून तिनेही अंग टाकलं.... आईचं मन पुन्हा गहिवरून आलं ते त्यांना सुध्दा कळलं, पण कधी कधी आसवंच दुःखात आपले सोबती असतात म्हणून त्यांचं पावसासारखं बरसन आवश्यक असत, मन हलकं होतं आणि दुःख किंचित कमी होत असेल असं वाटल्याने त्यांनी तिला यावेळी दिलासा द्यायचं टाळलं, जेवण करून बराच वेळ झाला होता आणि बरंच काही बोलणं झालं होतं म्हणून घसा जरा कोरडा पडला असं आर्यन ला जाणवलं...''मला तर तहान लागली आहे, तुम्ही पाणी पिणार का? तर सगळ्यांसाठी आणतो...''त्याने तिघांकडे एक नजर बघत विचारलं.... तेव्हा हातानेच हो अस त्यांनी दर्शविलं.... मग आर्यन ने सगळ्यांना पाणी दिलं, तो स्वतः देखील प्यायला... अंगणात निळ्या आभाळाखाली अंथरुणावर अंग टाकून एका पाठोपाठ एक सगळे झोपी गेले...

## ४३. अपेक्षाभंग

रोजच्यासारखाच आजचा दिवस उगवला, सर्वांसाठी एक अजून सकाळ झाली... गावात सकाळचं वातावरण कसं मनमोहक असत ते एव्हाना तिघांना कळलं होतं आणि कोंबड्याच्या आरावण्याने आज त्यांना पण लवकर जाग आली, सर्वांनी पटापट सगळं आटोपलं. त्या माऊलीने सडा शिंपून रखरखं झालेलं अंगण परत एकदा आधीसारखं केलं.. घर जरा आवरलं आणि सगळ्यांचा चहा वगैरे झाला. त्यांना चहा पितांना बघून तिला आपल्या मुलाची आठवण आल्याखेरीज राहिली नाही, ती सांगायला लागली,"एकवेळ त्याला जेवण वेळेवर मिळालं नाही तरी चालेल पण चहा वेळेवरच लागतो, सकाळी आणि संध्याकाळी...!"

"हो का, काकू...!"आर्यनने प्रतिसाद दिला..

त्यावर ती डोळ्याला पदर लावून मानेनेच हो म्हणाली.. आता ती पुन्हा अनावर होऊन रडेल अस वाटल्याने प्रशांत लगेच तिच्याजवळ जाऊन तिला समजवायला लागला,"आई, रडू नकोस... दादा ना लवकर ठीक होईल मग घरी आला की आपल्या सोबतच चहा पिऊन गप्पा गोष्टी सांगेल..."

खरं तर त्याने तिला खोटी आशा देऊन समजावलं हे त्याच्याही लक्षात आलं आणि इतरांच्या हि पण मनाला आस, अपेक्षा तर हव्याचं ना... ती आस किंवा अपेक्षा पूर्ण होईल की नाही हे वेळेवर सोडून द्यावे लागते. पण त्याच्या करूण शब्दांनी तिला बरं वाटलं, ती परत एकदा कशीतरी सावरली... लवकर आपल्या मुलाला बघायचं, तो आई म्हणून हाक मारेल अन मी त्याला स्वतः जेवण भरवेल अशी अपेक्षा मनात बाळगून जायला उशीर व्हायला नको म्हणून ती जेवण बनवायला स्वयंपाक घरात गेली...

सकाळचे ९ वाजून गेले तर ती माउली, प्रशांत, आकाश एका दुचाकीवर आणि सुजित, आर्यन, अनिरुध्द आणि

ऋतुराज इतर दोन दुचाकी वर दवाखान्यात जायला निघाले... दुचाकीचे चाक जसे फिरू लागले तसेच प्रत्येकाच्या मनात विचारचक्र सुरु झाले. मन ना क्षणात काय विचार करेल सांगता येत नाही कधी काही अन कधी काही... परिस्थिती प्रतिकूल असेल तर मन विचार करतच राहतं कुठंतरी एका विचारांवर त्याला थांबवस वाटत नाही सतत कसल्यातरी विचारात ते मग्न असतं... काहीतरी चांगलं व्हावं ज्यामुळे मन समाधानी होईल असंच काहिस अपेक्षित धरून माउलीच्या मनात विचार आला,''जन्मापासून ज्याला नजरेसमोर हळूहळू मोठं होतांना, घुडघ्यांवर येतांना, मग जरा उभं राहताना, पडतांना, लागलं की रडतांना, हसतांना, पळतांना, वयाने वाढतांना, खेळतांना, बोबडे बोलतांना, हाक मारताना, हट्ट करताना, कुशीत झोपतांना कधी घाबरून बिलगतांना, कधी काळजी घेतांना, समजदार झाल्यावर धीर देतांना, घरची जबाबदारी घेतांना अशी स्वतःच्या मुलाची कित्येक रूपं बघितली...''

त्याचं आजपर्यंत जगणं अस अचानक काळाने, अपघाताने, नशिबाने, नियतीने कि निर्मिकाने हरवून घेतलं अन आज त्याला यातलं काहीच आठवण नव्हतं....

तर प्रशांत याच रस्त्याने त्याच्या भावासोबत शाळेला जायचा ते अचानक त्याला आठवलं म्हणून कि काय तो भूतकाळात हरवून गेला. हात धरून सोबत शाळेत जाणं, वर्गात बसवून देणं, सुट्टीत जेवायला बसवून जेवण करून खेळायला जाणं, घरी परततांना ' हळू हळू पळ, प्रशांत.. पडशील जरा सांभाळून ' असं त्याला जुन्या आठवणीत वेळेने गुंतून ठेवलं..

सुजितच्या मनात,''इतकं सारं आयुष्य तो ज्यांच्यामुळे जगला त्या जन्मदात्या आई बाबा ला, भावाला पण विसरला? आम्ही त्याचे कितीतरी वर्ष्या पासून मित्र आहोत याचा पण त्याला विसर पडला आणि जिच्यावर जिवापाड प्रेम केलं तिला पण विसरला असेल का? त्याची डायरी तरी त्याला आठवण असेल की नाही..? ''एकामागून एक विचार यायला लागले...

आर्यन,"खरंच असं काही शक्य आहे का? एक अपघात आणि संपूर्ण जगलेले क्षण पाण्यात काही विरघळून नाहीस व्हावं अस होत असेल का? त्याला काहीच कसं आठवण नाही? कदाचित डॉक्टरांचं काही चुकलं असेल का?"विचारात तो हो बुडाला.

तर अनिरुध्द जरा वेगळया प्रश्नांनी वेढला,"स्वतःला विसरणं हा कसला आजार ! स्वतः आपण कोण? हा प्रश्न पडणं म्हणजे अगदी न पटण्यासारखं... नेमकं काही तर त्याला आठवण असेल त्याने पुन्हा नव्याने एकदा डायरीच्या निमित्याने जगलेले ते क्षण आणि...... आणि.... आमच्याबद्दल लिहून ठेवलेले ते सोनेरी क्षण हे तर त्याला आठवण असेल ना...."

ऋतुराजने त्याच्या मनाला विचारांच्या आहारी जायचं टाळलं कारण जे घडून गेलं किंवा जे काय झालं ते विचार

केल्याने बदलणार नाही आणि सुजित ने जी योजना सुचवली त्यातून अपेक्षित असलेलं मिळालं पाहिजे... काही क्षणापुरते असे विचार त्याच्या मनात आले लगेच रस्त्याकडे लक्ष देऊन तो दुचाकी चालवायला लागला...

थोड्या वेळातच ते दवाखान्यात पोहोचले तर तिन्ही वडील मंडळी बाहेर हॉलमध्ये बसून होते, तिथेच संवाद सुरु झाला..''अहो, तुम्ही चहा घेतला ना आणि तिघांनी पण काही नास्ता वगैरे केला की नाही?''त्यावर त्यांनी,''हो, चहा नास्ता झाला.''अस सांगितलं...

सर्व काहीवेळ हॉलमध्येच टी व्ही पाहत बसले, तर ती माउली प्रशांत आणि आकाश कुमार ला बघायला निघाले बाकी तिथेच थांबले. दवाखान्यात असलेल्या रुग्णांना बघण्या करिता, भेटीकरिता नातेवाईक मित्र मंडळी यायला सुरुवात झाली, तसं पाहिलं तर दवाखान्याच्या त्या एकाच छताखाली कितीतरी कुटुंब काहीसं सारखं सुख दुःख अनुभवत होतं पण

कुमारची अवस्था अनपेक्षित, कुणाला सहजासहजी विश्वास बसणार नाही अशी झाली होती...

ती माउली मोठ्या आशेने दाराच्या काचेतून मुलाला पाहत होती, नर्स त्याला तपासून काहि वेळात बाहेर आली, तशी तिने विचारणा केली,”आता तो कसा आहे? त्याला बरं वाटतं ना?”

“थोडा वेळा आधी त्याला जाग आली, तब्येतीत सुधारणा आहे आणि डॉक्टर आल्यावर त्याला तपासतील...”नर्स म्हणाली.

“त्याच्यासाठी जेवणाचा डबा आणला आहे, त्याला जेवायला देऊ का?”

“हो हो, पण जास्त विचारपूस करू नका...! जेवण झालं की त्याला आराम करू द्या."

इतकं बोलून ती नर्स इतर रुग्णांना बघायला निघून गेली, कुमारच्या आईने डबा हाती घेतला, ती त्याला जेवण द्यायला आत गेली सोबत प्रशांत आणि आकाश हि गेले... तो वर फिरणाऱ्या पंख्याच्या पात्यांना टक लावून बघत होता, तिने आवाज दिला,"कुमार, कुमार उठालास का?"

त्याने आवाजच्या दिशेने नजर फिरवली त्यांना अनोळखी नजरेने बघितलं... त्याच्या नजरेतूनच तिला समजलं की अजूनही त्याला काहीएक आठवत नाही, मग समोर होऊन ती बोलायला लागली,"बाळा, मी तुझी आई आहे.. भूक लागली असेल ना उठ, आधी जेवून घे..."

त्याला जरी काही आठवत नव्हतं पण तिच्या चेहऱ्यावरचे भाव, आवाज यातून वात्सल्य त्याला दिसून आलं की काय तो उठून बसला, ती स्वतःच्या हाताने त्याला घास भरवायला लागली.. त्याने तिच्या चेहऱ्यावर आणि त्या

दोघांना एक एक नजर बघून जेवण केलं, पाणी पिल्यानंतर त्याने विचारलं''हे दोघे कोण आहे?''

त्याच्या प्रश्नाने जरावेळ दोघेही दुखावले पण लगेच त्यांना कुमारच्या अवस्थेची जाणीव झाली,''मी तुझा लहान भाऊ प्रशांत आणि हा मित्र आकाश...''प्रशांत ने हसऱ्या मुखाने उत्तर दिले, त्याने नजर रोखून जणू काही आठवायचा तो प्रयत्न करु लागला अस एकवार त्यांना पाहिलं पण काहीच बोलला नाही तेव्हा,''दादा, तू ना आता आराम कर... नंतर भेटू..''इतकं बोलून ते जायला निघाले तेव्हा तिला वाटलं कि तो आई म्हणून एकदा हाक मारेल... पण तसं काहीही झालं नाही आणि ते बाहेर पडले, तिच्या डोळयात आसवं बघून, प्रशांत ने इतक्यावेळ पापण्यांवर आलेल्या आसवांना वाट मोकळी करून दिली...

## ४४. अधीरता

काही वेळात भावनांचा ओघ सरला ते तिघे हॉलमध्ये आले आणि जे काय कुमार बोलला तेवढं त्यांना सांगितलं, आत गेलो तेव्हा तो कुठंतरी हरवला आहे असं वाटलं, आवाज दिला तर त्याने  नुसतं नजर वळून बघितलं मग त्याला जेवण दिलं पण त्याला काहीहि आठवण नाही हे खरं आहे, डॉक्टरांचं म्हणणं पटलं असंही त्यांनी सांगितलं... असं सगळं ऐकून सर्वांना वाईट वाटलं... खास करून तिच्यासाठी !

इतक्यात डॉक्टर देवांश वैद्य समोरून येतांना दिसले, तसे सर्वजण त्यांच्याकडे बघत बोलायचे थांबले. चेहऱ्यावर स्मित हास्य घेऊन डॉक्टर त्यांच्याजवळ आले, एक नजर सर्वांना बघून केबिन कडे जातांना कुमारच्या वडिलांच्या खांद्यावर हात ठेवून जणू त्या स्पर्शा ने त्यांना धीर दिला, आपुलकी जाणवली...

काहीवेळ सर्व शांत झालं, डॉक्टर नर्स ला सोबत घेऊन राऊंडला निघाले, कुमारला भेटून तपासलं,''कुमार, कसा आहेस?''“बरं वाटतं…''कुमार म्हणाला.''काही त्रास होत आहे का? रात्री झोप लागली ना?''

त्यावर''डोकं जरा दुखत आहे, हो झोप लागली होती''तो म्हणाला

“जेवण केलं की नाही?''त्यांनी डोक्याचं ऑपरेशन झालं ते बघत असता विचारलं…''हो, जेवलो..''इतकंच तो म्हणाला

“लवकरच तु पूर्णपणे बरा होशील, आराम कर…''

त्याने मान जरा हलवून नजरेनेच होकार दिला…''डॉक्टर ने नर्स ला औषध द्यायला सांगितलं मग ते बाहेर आले तर सर्वजण त्यांची बाहेर येण्याची वाट बघत होते… ते काही विचारणार तोच डॉक्टरांनी हातानेच त्यांना इशारा केला आणि सर्वांना केबिनमध्ये बोलावलं… सर्वजण आत गेले.

“कुमार, आता कसा आहे?''त्याच्या वडिलांनी विचारलं

त्यावर डॉक्टर वैद्य म्हणाले की,’’तो आता बऱ्यापैकी ठीक आहे...’’

त्याच्या आईने जेवण देतांना जे अनुभवलं ते डॉक्टरांना सांगितलं, मध्येच प्रशांत ने सुध्दा,’’दादा ने आम्हाला साधं ओळखलं पण नाही...’’बोलून दाखवल...

जरावेळ हातात घेतलेला मोबाईल हातातच फिरवून डॉक्टरांनी टेबलवर ठेवला, ते बोलायला लागले,’’कुमार, सध्या अपघातून बचावला, ऑपरेशन पण व्यवस्थित पार पडलं, लवकरच तो पूर्णपणे बरा होईल याची खात्री आहे पण...’’इतकं बोलून ते परत पेन हाती घेऊन विचार करू लागले....

‘‘पण... पण काय?’’जवळपास सर्वांनी प्रश्न विचारला

‘‘जेव्हा एखाद्या व्यक्तीला स्मृतिभ्रंश होतो आणि त्याला सगळ्या गोष्टींचा विसर पडतो तेव्हा ते सर्व परत आठवण करून

आधीसारखं व्हायला, जगायला वेळ लागणार, पण किती वेळ लागेल हे सांगता येत नाही...!"डॉक्टर वैद्य यांनी सांगितलं आणि त्याच्या आई वडिलांकडे एक नजर बघितलं.

"म्हणजे आमच्या मुलाला आम्ही त्याचे आई वडील आहोत, हा प्रशांत त्याचा भाऊ आहे आणि हे सर्व त्याचे मित्र हे कधीच आठवणार नाही..?"त्याच्या आईने भावूक होऊन एक श्वासात प्रश्न केला.

"त्याचं आतापर्यंत च आयुष्य त्याला काहीही आठवण नाही, तर ते सर्व जसंच्या तसं आठवायला त्याला किती वेळ लागेल हे पण सांगता येत नाही हे कसं शक्य आहे?"सुजीतच्या वडिलांनी विचारलं आणि बाकीच्यांनी त्यांना दुजोरा दिला..

त्यावर डॉक्टर म्हणाले की,"जेव्हा कधी कुणासोबत असं झालं तर ती व्यक्ती आणि त्याच्या मनात घर करून असलेल्या आठवणी यांत किती घनिष्ठता आहे यावर हे सगळं अवलंबून

असतं... तसेच आजूबाजूला त्याला आठवत असलेल्या गोष्टी नव्याने घडल्या किंवा आढळल्या कि हळूहळू विसर पडलेल्या गोष्टी आठवायला लागतात... म्हणून मी म्हटलं की हे सर्व वेळेवरच सोडून द्यायला हवं...."

हे सर्व ऐकून सर्व निराश झाले कारण अस काही त्यांना नक्कीच अपेक्षित नव्हतं... वेळेवर पूर्णतः एखादी गोष्ट लोटून देणे म्हणजे दुर्लक्ष केल्यासारखं किंवा हतबल झाल्यासारखं नाही का ! अस काहीसं त्याच्या कुटुंबियांना वाटलं तर आता नेमकं काय करावं? हा प्रश्न त्यांना पडला आणि प्रशांतने डॉक्टरांना तसं विचारल त्यावर डॉक्टर इतकंच म्हणाले की ,"सध्या धीर ठेवायला हवा आणि त्याला पूर्णपणे बरा होण्याची वाट बघणं योग्य राहील.."

असा संवाद बंद केबिनच्या आत झाला आणि हताश होऊन सगळे बाहेर जायला लागले तर सुजित, आर्यन, अनिरुध्द, ऋतुराज मागेच थांबले मनात जी काय योजना होती ती अमलात आणण्याकरिता आधी डॉक्टरांशी सल्ला मसलत करणे आवश्यक आहे हे त्यांनी आधीच ठरवलं होतं पण

थोड्या वेळापूर्वी डॉक्टरांनी जे काय सांगितलं त्यामुळे काही नवीन प्रश्न निर्माण झाले, ज्याचं निराकरण होणं जास्त गरजेचं आहे हे लक्षात घेऊन ते चार जण जागीच थांबले...

बाकी सर्व केबिनच्या बाहेर पडताच ऋतुराज समोर आला आणि डॉक्टरांशी बोलायला लागला...''डॉक्टर आम्हाला तुमच्याशी काही बोलायचं आहे, जरा चर्चा करायची आहे..''आर्यन, सुजित आणि अनिरुध्द यांनी सुध्दा नजरेने जणू विनवणी केली..

डॉक्टरांनी त्यांना बसायला सांगितलं,''हा, बोला काय चर्चा करायची आहे?''

नेमकं काय बोलावं हा प्रश्न निर्माण झाला तेव्हा आर्यन ने सुरुवात केली,''सर, मघाशी तुम्ही म्हणालात कि एकदा आठवणींचा विसर पडला, स्मृतिभ्रंश झाला की, परत जसंच्या तसं आठवायला किती वेळ लागेल सांगता येणार नाही.."

“हो, अगदी बरोबर आहे...”डॉक्टरांनी प्रतिसाद दिला

“कुमारला जर काही गोष्टी ज्या आधी त्याच्या जीवनात घडून गेल्या तश्याच पुन्हा नजरेस आल्या किंवा अनुभवास आल्या तर त्याला सर्व आठवेल..”अनिरुध्द जरा पुढे होऊन म्हणाला.

“हो, अशी एक शक्यता आहे..”डॉक्टर म्हणाले

आता नेमकं मुद्द्याचं बोलायचं असा इशारा करत आर्यनने सुजितला बघितलं तेव्हा सुजितने,”डॉक्टर, आम्हाला अस विचारायचं आहे की, जर कुमारला आम्ही काही त्याच्या जीवनातील गोष्टी सहज बोलता बोलता सांगीतल्या तर त्याला ते सर्व पुन्हा आठवेल ना?”

“हो, असं होऊ शकत....”डॉक्टर म्हणाले

हे ऐकून त्यांना आनंद झाला, नवी आशा मिळाली... आपली योजना उपयोगी पडेल या विचाराने त्यांना हायसं वाटलं...

आम्ही कुमारचे खूप दिवसांपासून मित्र आहोत, बऱ्याच गोष्टी आम्ही एकमेकांना सांगितल्या आहेत, काही क्षण अगदी कधीच विसरता येणार नाही असे सुध्दा आहेत आणि महत्वाची गोष्ट म्हणजे ते सर्व जगतांना कुमार सोबत होता तर त्याला नक्कीच ते आठवेल असं वाटतं... सर्वांनी मिळून डॉक्टरांना सांगितलं.

“पण काही गोष्ट तुम्हाला माहित असणं आवश्यक आहे की अश्या परिस्थितीत त्याला काहीही सांगणं म्हणजे त्याला त्याचा त्रास होईल कारण आठवतांना मेंदूला ताण पडतो... तर सध्या तरी त्याला काहीएक सांगता येणार नाही, सांगायला नको

असं माझं मत आहे, आणखी एक गोष्ट, त्याला तेव्हाच सांगितलेलं आठवेल जेव्हा त्याला ते पटेल त्यासाठी तुम्हा सर्वांना त्याच ओळखणं आणि तुमच्यावर विश्वास ठेवणे आवश्यक आहे.... कारण सध्या तुम्ही त्याच्यासाठी अपरिचित आहात....''डॉक्टरांनी योग्य मार्गदर्शन करत सांगितले.

“मग आता काय करायचं?''अनिरुध्द

“म्हणजे आम्हाला त्याची मदत करता येणार नाही?''सुजित

“नेमकं कधी त्याला सांगता येईल?''आर्यन

“त्याचा आमच्यावर विश्वास कसा काय बसेल?''ऋतुराज

सर्वांनी पाठोपाठ प्रश्न विचारले तेव्हा सगळ्या प्रश्नांची उत्तरे देत डॉक्टर म्हणाले,''बघा, कसं आहे ना, काही दिवस त्याला इथेच आराम करणं आवश्यक आहे तोपर्यंत तुम्ही त्याला अधून मधून भेट देणार तर नव्याने ओळख होईल, त्याच्याशी बोलतांना आपोआप विश्वास बसेल जरा वेळ लागेल, ठीक आहे....''

''हो...''चार हि जण म्हणाले

''मग प्रश्न राहिला कि त्याला जुन्या आठवणी कधी सांगायच्या?''डॉक्टर

''हो, हे राहिलं...''सुजित

''तर जेव्हा कुमार पूर्णपणे ठणठणीत बरा होईल आणि त्याला घरी घेऊन गेले की आजूबाजूचं वातावरण ते त्याने आधी बघितलेलं आहे तर काही दिवस त्याला ते निरीक्षण

करून अनुभवू द्या आणि मग थोडं थोडं त्याला रोज सांगता येईल पण त्याला जास्त डोक्यावर ताण पडणार नाही याची काळजी घ्यावी लागणार...”

डॉक्टरांनी सर्व समजावून सांगितले

“धन्यवाद, डॉक्टर...”ते म्हणाले

मला तर तुमची मदत करण्याची ही कल्पना खूप आवडली आणि तुमचं कौतुक वाटलं. तुमच्यासारखे मित्र मिळाले कुमार खरंच नशीबवान आहे. नक्कीच तुमच्या प्रयत्नांना यश मिळेल अशी अपेक्षा आहे....

“धन्यवाद, पण खरं तर आम्ही नशीबवान आहोत की कुमार आमचा मित्र आहे..”सुजित म्हणाला आणि तिघांनी मानेनेच सहमत असल्याचं सांगितलं

“हो का, वाह, मग तर नक्कीच तो परत एकदा जसा होता तसा बनेल.”डॉक्टरांनी विश्वासाने मत मांडले

अशी डॉक्टर आणि त्यांच्यात चर्चा झाली आणि ते सुध्दा केबिन मधून बाहेर पडले... बाहेर सर्व त्यांना विचारायला लागले तेव्हा असंच काही नाही, आणखी काय काय काळजी घ्यायला हवी ते विचारलं आणि त्याच्याशी अधून मधून भेटून परिचय करून घायचा अस डॉक्टर म्हणाले इतकंच त्यांनी सांगितले.

आपण काहीतरी ठरवतो पण नियती तसं घडू देत नाही, वेळ, परिस्थिती जशी असेल त्यानुसारच वागावं लागतं, निर्णय घ्यावे लागतात आणि काही प्रश्नांची उत्तरं वेळेवरच सोडून द्यावी लागतात...

## ४५. भूतकाळाचा स्पर्श

इकडे ती राहते त्या शहरात -

ती म्हणायला रोजच्या सारखीचं सकाळी वेळेवर उठली पण रात्रभर तिला झोप लागली नाही. सतत कुमार आणि त्याच्या डायरीत लिहिलेलं ते सर्वकाही तिच्या मनात वारंवार येत राहिलं, कित्येक जुन्या आठवणी तिला बेचैन करून गेल्या, कितीतरी प्रश्न तिला अंधारल्या खोलीत जणू काही घेरून होते... सकाळी ती उठली तर डोकं अगदी बाजूला काढून ठेवावं कि काय इतकं जड झालं असं तिला जाणवलं... तरी कसतरी ब्रश करून वगैरे कामाला लागली आणि तिने चहा नास्ता बनवून त्याला दिला, मनात असंख्य विचार येत, रात्रीची झोप झाली नाही म्हणून तिला अस्वस्थ वाटू लागलं.

तरी त्याला ऑफिसला जायचं आहे म्हणून तिने विचार करत करत स्वयंपाक केला आणि टिफिन पिशवीत ठेवून ती

बाहेर आली... सकाळचे १० वाजून गेलेले त्याला ऑफिसला जायला अजून १० - १५ मिनिट वेळ लागणार होता म्हणून तिने घरातील बाकी कामं आवरायला सुरुवात केली, काही वेळात तो जायला निघाला तेव्हा त्याच्या हाती ऑफिस बॅग आणि टिफिन देत तिने हसत मुखाने त्याला बाय केलं...

तो निघून जाताच तिला एकटेपणाची तीव्र जाणीव झाली, पुन्हा कुमारच्या डायरीतील लिखाण मनात यायला लागले आणि कुमारची सध्याची झालेली अवस्था..! प्रत्येक येणाऱ्या नवीन क्षणाला ती भूतकाळ आणि ज्यादिवशी कुमारला अपघात झाला तो दिवस, नशिबाला दोष देऊ लागली. कुमारच्या आयुष्यात हे काय संकट उभे राहिले ज्यामुळे डायरीचं गुपित उघड झालं जे व्हायला नको होतं आणि यातून कुमारची सुटका कशी होईल? का असं झालं? इतकं वाईट नशीब कसं काय असू शकतं? त्याला जे नशीबाकडून हवं होतं ते तर मिळालं नाही पण जे काय त्याने डायरीत लिहून नव्याने जगता येईल अशी अपेक्षा होती म्हणून पानांवर उतरवलं तर नशिबाने त्या आठवणी हि त्याच्याकडून हिरावून घेतल्या.

कित्येक विचारांनी तिला आणखी घायाळ केले, डोकं जणू काही एखाद्या दगडावर जोरात आदळावं असं तिला वाटलं. याक्षणी कुमारला या संकटातून कसं वाचवायच हे जास्त महत्वाचं आहे या विचाराने तिला जरा बळ मिळाले, ती त्याला भेटायला जायचं आणि डायरी परत करायची म्हणून पटापट राहिलेली कामं आटोपून निघायच्या तयारीला लागली... जवळपास ११ वाजून गेले तिने दाराला कुलूप लावलं ती बस् स्थानकाच्या दिशेने जायला निघाली... रोजच्या सारखीच आज ही बसमध्ये गर्दीच ! त्यात तिला तिथे पोहोचायला जरा उशीर झाला म्हणून खिडकीजवळ जागा मिळाली नाही, काही वेळात बस् सुरु झाली सर्वांचा प्रवास सुध्दा ! तिला वाऱ्याची झुळूक हळूच अधूनमधून स्पर्श करून जायची, तिच्या डोळयांवर रात्रभऱ्याची झोप बाकी होती म्हणून तिला एक दोन वेळा डुलकी आली एक अनामिक क्षणाला तिला गाढ झोप लागली...

एक तास झाला असेल बस त्या शहराला पोहोचली, तेव्हा कंडक्टरने तिला आवाज दिला आणि तिला जाग आली. घाईघाईत कसेतरी डोळे चोळून चेहऱ्यावर आलेले केस बाजूला करून ती खाली उतरली... समोरच एक पाण्याचा नळ दिसला तर तिने चेहऱ्यावर पाणी शिंपडले, साडीच्या पदराने ओला चेहरा पुसला मग ती झाडाच्या सावलीत उभी राहिली, मोबाईल बाहेर तिने सुजितला फोन लावला,”हॅलो, सुजित.”

पलीकडून त्याने”हॅलो”म्हणत प्रतिसाद दिला

"तू कुठे आहेस? मी बस स्थानक ला पोहोचले.."

“आम्ही सर्व दवाखान्यात आहोत आणि तू तिथंच थांब मी तुला घ्यायला येतो”

“बरं ठीक आहे, मी इथेच थांबते”

“हो, बस् मी निघालोच..”इतकं बोलून त्यांनी फोन कट केला... त्याला यायला वेळ लागणार अस लक्षात येताच तिने काही घ्यायला हवं म्हणून फळं घेतली, त्याची वाट बघत परत त्या झाडाखाली जाऊन उभी राहिली...

१५ मिनिटं झाली असतील सुजित तिथे पोहोचला, त्याने खिश्यातून मोबाईल बाहेर काढून तिला फोन लावला जरा नजर फिरवली तर ती त्याच्या नजरेस पडली तसा त्याने फोन कट करून परत मोबाईल खिश्यात ठेवला... तो ती ज्या झाडाखाली उभी होती तिथे दुचाकी घेऊन गेला, तिला सोबत घेऊन तो दवाखान्याला परत जायला निघाला.....

## ४६. अंकुर

दुचाकी चालवत वाटेत जाता जाता त्याने तिला आज जे झालं ते सर्व सांगितलं... तिला हे ऐकून खूप वाईट वाटलं की, ' कुमारने त्याच्या आईला भावाला सुध्दा ओळखलं नाही.' त्याचबरोबर जेव्हा डॉक्टरांशी बोलणं झालं तेव्हा जे काय त्यांनी सांगितलं होतं ते ऐकून तिला सुध्दा धक्का बसला कि कुमारला परत सर्व आठवायला नेमका किती वेळ लागेल हे सांगता येणार नाही आणि सर्वकाही आता वेळेवरच अवलंबून आहे.... तर त्या चौघांनी जी योजना आखली आणि डॉक्टरांशी ते जे काही बोलले ते तेव्हा तिला सांगायचं त्याने टाळलं, काही १५ - २० मिनिटांत ते दोघे दवाखान्याजवळ पोहोचले...

दुचाकी पार्किंगला लावून ते दोघे आत शिरले, बाहेरच्या तापत्या उन्हातून नुकतंच आत एसीच्या गार हवा असलेल्या त्या वातावरणात आल्याने त्यांना जरा बरं वाटलं... तिने कुमारच्या आई जवळ जाऊन नमस्कार केला, तिच्या बाजूला बसून ती तब्येत वगैरे कशी आहे? कुमार कसा आहे? जेवण

केलं का ? असा काही त्यांचा संवाद सुरु झाला आणि काहीवेळ असंच बोलणं झालं... दोघीनाही बोलून समाधान मिळालं त्यांच्या चेहऱ्यावरून तसं दिसून आलं... एक स्त्री चं मन दुसरी स्त्री जास्त चांगलं समजू शकते हेच खरं ! तिने सोबत आणलेली फळं समोरच्या टेबलवर ठेवून त्याला नंतर खायला देऊ, काळजी करू नका सर्व ठीक होईल म्हणत तिने त्यांना आणि स्वतःच्या मनाला दिलासा दिला...

तर आर्यन, अनिरुध्द, ऋतुराज कुठेच दिसत नाही म्हणून आता हे कुठे गेले? अस मनातल्या मनात स्वतःलाच विचारून त्याने गॅलरीजवळ चालत चालत जाऊन आजूबाजूला बघितलं पण त्याला कुणीच दिसलं नाही तेव्हा आकाश समोरून पाण्याची बॉटल घेऊन येतांना त्याला दिसला..."आकाश, पाणी कुणासाठी घेऊन जात आहेस?"

"तुझे बाबा, आणि काका जेवण करत आहेत त्यांना पाणी हवंय..."

“बरं बरं, एक सांग हे तिघे कुठे आहे? दिसत नाही कुठे गेले कुणास ठाऊक?”असं त्याला विचारत बहुतेक, याला ठाऊक नसेल असं वाटून सुजितने खिश्यातून मोबाईल बाहेर काढला...

“दादा, त्यांना फोन लावू नको, ते गाडी चालवत जात असतील...”आकाश म्हणाला

“म्हणजे हे बाहेर गेले की काय?”सुजितने विचारलं...

“हो, ऋतुराज दादाला घरून फोन आला होता तर तो जायला निघाला तर आर्यन दादा, अनिरुध्द दादा अंघोळ वगैरे आटोपून लवकर परत येऊ असं सांगून तिघे सोबतच गेले...”आकाशने सांगितलं..

मग ते सोबतच कुमारच्या रुमजवळ आले, आकाशने पाण्याची बॉटल त्यांना नेऊन दिली, सुजित कुमारला दाराच्या गोल काचेतून बघत दाराजवळ उभा राहिला इतक्यात ती सुध्दा बाजूला येऊन थांबली..

“मी काय म्हणत होते, हि फळं त्याला खायला दिली असती आणि त्याला आत जाऊन बघितलं असतं...”

“कुमार तर झोपला आहे, त्याला औषध दिलं त्यामुळे बहुतेक त्याला झोप लागली..."

“हो का”असं म्हणत तिने एक नजर काचेतून त्याला बघितलं..”बरं राहू दे तो उठला कि खायला देऊ...”

“हो, हे ठीक राहील, बरं तू चहा घेणार का?”

सुजितला काहीतरी बोलायचं आहे हे तिला त्याच्या चेहऱ्याचे हावभाव बघून समजलं,''हो, चालेल..''ती इतकंच बोलली.

कँटीन ला जाऊन त्याने चहा ची ऑर्डर दिली, दोघेही जरावेळ आजूबाजूला बघत चहा प्यायला लागले पण संवाद नेमका कसा सुरु करायचा दोघांनाही जमत नव्हतं... शेवटी चहा पण संपला. मग सुजितनेच बोलायला सुरुवात केली... आणि थोडक्यात तिला सांगितलं की जुन्या काही गोष्टी कुमारशी बोलता बोलता त्याला कळल्या तर तो पुन्हा सर्व आठवून आधीसारखा होईल अशी अपेक्षा आहे म्हणून आम्ही त्याला त्याचंच जगलेलं आयुष्य पुन्हा एकदा आठवायला मदत म्हणून अशी योजना आखली कि त्याला सर्वजण मिळून थोडं थोडं सांगायचं तर यांत त्याच्या डायरीची महत्वाची भूमिका आहे... इतकं बोलून तो थांबला, भावनेच्या भरात डायरीचा विषय निघाला म्हणून त्याला जरा चुकल्यासारखं वाटलं..

आपल्याला डायरीबद्दल काहीच माहित नाही असं दाखवत ती म्हणाली,”कोणती डायरी? तुला काय म्हणायचं आहे?”

“तेच ते चुकून तुझ्या बॅगमध्ये टाकलं होतं ना तिचं डायरी आहे... कुमारने लिहिलेली !”

म्हणजे सुजितला डायरीबद्दल माहित आहे, त्याने वाचली तर नसेल ना? स्वतःलाच प्रश्न करत ती क्षणभर हरवली,”तुला डायरीबद्दल कसं माहित? काय डायरीत काय आहे असं? “

तेव्हा हिला बहुतेक काहीच माहित नाही, अजूनपर्यंत हिने ती डायरी वाचली नाही असं त्याला वाटलं”कुमारला दवाखान्यात आणलं होतं तेव्हा मला ती डायरी मिळाली तर त्याने त्यात काही महत्वाचं लिहून ठेवलं असेल की ज्यामुळे काही मदत होईल असं वाटतं..”डायरीचं गुपित त्याला माहित

आहे हे त्याने तिला कळू दिलं नाही तर तीनेसुध्दा डायरी अजून उघडून सुध्दा बघितली नाही असं त्याला दाखवलं...

“तू ती डायरी सोबत आणली ना?”

“हो बॅगमध्येच आहे.. आता देऊ का?”

“नको, तुला बस् स्थानकाला सोडेल तेव्हा देशील तोपर्यंत तुझ्याकडे राहू दे...”

आम्ही योजना तर आखली पण ना एक अडचण आहे की सध्या कुमारला काहीही सांगता येणार नाही, कारण त्यामुळे त्याला त्रास होऊ शकतो आणि सर्वांत महत्त्वाचं म्हणजे आधी कुमारला आपण कोण हे आठवलं पाहिजे, आपली ओळख नव्याने करून द्यावी लागेल असं डॉक्टर म्हणाले... असं त्यांचं बोलणं झालं आणि संवादाला पूर्णविराम द्यावा लागला. काही क्षण ती चहाच्या रिकाम्या काचेच्या ग्लासला बघत राहिली

जणू काही कुमारचं आयुष्य देखील असंच काहीसं रित झालं तिला समजून आलं.तिला असं हरवलेलं बघून त्याने तिला आवाज दिला,”परत चालायचं..”त्यावर”हो”म्हणत ती खुर्चीवरून उठली मग दोघेही तेथून बाहेर पडले आणि परत आले...

कुमार अजून झोपला होता, तर त्याला आरामाची खूप गरज आहे हे लक्षात घेता त्याला उठवण्याचा प्रयत्न करावा असं त्यांचा मनात आलं नाही... म्हणून ती परत त्या माऊली जवळ जाऊन बसली तिला धीर देत जुन्या आठवणी ताज्या करत गोष्टी सांगत होती कधी तिच्या तोंडून ऐकत होती... तिच्या डोळ्यात पाणी बघून तिचे डोळे पाणावले... कसेतरी ते आसवं लपवत बाजूला चेहरा करून तिने हळूच पदराने टिपले, भावना अनावर होऊन मन विचलित झालं. त्यात रात्रभर जागरण झालं, डोळे तर फक्त नावालाच मिटलेले.. डायरीचं गुपित उघड झालं अन डोळ्यावरची झोप उडाली...

अन मन जास्तच भावूक झालं, भावनेच्या भरात काहीही विचार यायला लागले एका क्षणाला तो विचार आला आणि ती खूप जास्त अस्वस्थ झाली की,"कुमारच्या जीवनात हि जी अवस्था, वेळ आली हि कायम तर नाही ना राहणार..! काल जी माझी झोप उडाली ती तात्पुरती कि कायमची? आयुष्यभर हे डोळे झोपेची भीक मागत बसणार का? कि नेहमीसाठी असंच जगणं वाटेल येईल की काय? असे कितीतरी विचार प्रश्न बनून मनात आले ती बेचैन झाली, डोकं इतकं जड झालं की भोवळ येऊन बेशुध्द झाली, नंतर तिच्यावर उपचार झाले, तिला बेडवर आरामासाठी टाकलं याची तिला किंचितही जाणीव नव्हती... काही वेळाने तिला जाग आली तर तिला आपण बेडवर का पडून आहे? नेमकं काय झालं? परत प्रश्नांनी घेरलं... मग जरावेळ विचार बाजूला सारत तिने वर फिरणाऱ्या पंखांच्या पात्यांना पाहिलं, पापण्या जड व्हायला लागल्या तिला नकळत झोप लागली...

कुणीतरी मायेने मस्तकावरून हात फिरवत आहे असं तिला जाणवलं, तिच्या डोळयांनी जरा हालचाल केली

पापण्यांवर तसं त्या माऊलीला दिसून आलं. काही क्षणात तिने डोळे उघडले..."कशी आहेस?"कुमारच्या आईने विचारलं

"जरा बरं वाटतंय … मला काय झालं होतं?"

"अचानक तुला चक्कर आली आणि शुध्द हरपली होती.."यावर ती काहीहि बोलली नाही, तर तिनेच काळजीने विचारलं"तुला कसला त्रास तर नाही ना? घरी सर्व ठीक आहे ना? काही अडचण तर नाही?"

"काळजी करण्यासारखं काही नाही, सर्व चांगलं आहे, इतक्यात जरा दगदग होत आहे आणि उन्ह खूप तापते ना म्हणून असेल कदाचित.."ती बोलली

"बरं आता तू ना आराम कर, काही हवंय का?"

“हो काकू, काही नको..”ती म्हणाली मग ती माउली परत एकदा तिच्या केसांवरून हात फिरवत हसऱ्या चेहऱ्याने तिला एक नजर बघून बाहेर गेली...

## ४७. आशेचे किरणं

एखादं तास आराम करून तिला बऱ्यापैकी डोकं शांत झाल्यासारखं जाणवलं.. डॉक्टरांनी तिला तपासलं, काळजीचं तसं कारण नाही पण तरी काही औषध देतो ती वेळेवर घ्या आणि पुरेशी झोप आवश्यक आहे... तिच्या जरा खोल गेलेल्या डोळ्यांना बघून डॉक्टर म्हणाले, तिने मानेनेच होकार दिला...

“डॉक्टर, मला घरी जायचं आहे.. मी जाऊ शकते ना?”

“हो तुम्ही जाऊ शकता, प्रवासात काळजी घ्या, घरी गेल्यावर आराम करा.."

“हो डॉक्टर...”असं म्हणत ती बेडवरून उठली, डॉक्टरांच्या पाठोपाठ बाहेर पडली, सर्वांनी तिच्या तब्येतीची विचारपूस केली तर आता बरं वाटत आहे असे ती म्हणाली.... बॅगमधून मोबाईल बाहेर काढून तिने एकदा वेळ बघितला तर

३:०० वाजून गेले होते, आता परत निघायला हवं पण कुमारला तर भेटायचं राहून गेलं या विचाराने तिचे पावलं जागीच थांबले,"काकू, कुमार अजून उठला नाही का? त्याला भेटून घरी जायचं म्हणत होते.."

"हो त्याला जरावेळ आधीच जाग आली, चल भेटू.."अस म्हणत तिने हात धरून तिला त्याच्या रूममध्ये नेलं... तो खिडकीतून बाहेर बघत होता कुणीतरी आत आलं, जरा चाहूल लागली... त्याने दाराकडे वळून बघितलं अन नजरानजर झाली जवळ येईपर्यंत तो नजर रोखून बघत राहिला आणि खूपच जवळ आल्यावर त्याने त्याच्या आईला पाहिलं जणू त्याच्या नजरेत प्रश्न होता आणि नव्हता पण..!

"हॅलो कुमार, कसा आहेस?"

"ठीक आहे.. पण तू कोण? सॉरी, म्हणजे मी ओळखलं नाही..."

ती बोलायची तशीच थांबली.. डोकं आधीच जड झालेलं त्याच्या अश्या बोलण्याने मन पुन्हा विचारात गुंतलं, ती क्षणभर हरवली. तिला अस बघून त्याच्या आईनेच बोलायला सुरुवात केली...

“तुझी मैत्रीण आहे, खूप दिवसांपासून तुमची मैत्री आहे... नाव जरा कठीण आहे मला आठवत नाहीये..”तिच्याकडे मान वळवून”मला पण विसर पडत चाललाय.. तूच सांग बाई नाव....”जरा हसत ती माउली म्हणाली.

“कुणीतरी म्हटलंच आहे की नावात काय आहे? मैत्रीण आहे इतकंच पुरे..”हलकेच हसून ती बोलली

क्षणभर त्याने नुसतं तिचं बोलणं ऐकून तिला बघितले,”बरं असू दे...”तो म्हणाला

“हो, आणि आता मी निघते मला जायला उशीर होईल, लवकर बरा हो...”त्याने मानेनेच हो म्हटलं मग त्याच्या आईकडे बघून”चला काकू.”म्हणत दोघी जायला लागल्या..

तो तिला पाठमोरी बघत होता, तिला हे जाणवलं, दाराजवळ पोहचून तिने एकदा किंचित मागे वळून पाहिलं तेव्हा तिला त्याच्या डोळयात हळूच चमक आल्याचं दिसलं... मग दोघीहि रूममधून बाहेर आल्या. तर तो काहीतरी वेगळंच जाणवलं पण नेमकं काय? हृदयाची धडधड वाढली, नजर काहीतरी शोधत आहे आणि अजून हि काहीतरी झालं पण काय? असे प्रश्न त्याला पडले... ती कोण होती? मैत्रीण आहे तर मला आठवत का नाही? काय तिचं नावं बरं? तिची ती नजर पुन्हा पुन्हा आठवत असता काही चित्र नजरेसमोर साकारली अस त्याला वाटलं पण ते काही क्षणापुरत झालं ओळख मात्र पटली नाही. बरेच विचार मनात घर करायला लागले, तो बेचैन झाला काहीएक समजत नाही मी स्वतः कोण हेसुध्दा मला ठाऊक नाही असा विचार डोक्यात आला तेव्हा जरावेळ एकटक खिडकीबाहेर नजर फिरवली. एका ठिकाणी जाऊन

नजर जागीच थांबली काही वेळात पापण्या जड होऊन त्याने डोळे मिटले, त्याला झोप लागली...

ती सर्वांचा निरोप घेऊन परत जायला निघाली, सुजित तिला घेऊन बस् स्थानक येथे पोहोचला. तिने बसमध्ये बसण्याआधी डायरी त्याच्या हातात दिली पण तिचं मन द्यायला मानत नव्हतं... तिने मनाला कसतरी आवरलं आणि पापण्यांत आसवं रोखून धरले.''सुजित, मी सीटवर बसते''इतकंच भरून आलेल्या गळ्याने ती बोलली.

''हो, जा बस्, आणि पोहोचल्यावर एक कॉल करशील... काळजी घे...''

तिने हातानेच इशारा करून किंचित मानेने होकार दिला ती सीटवर जाऊन बसली, खाली मान घालून आसवं ढाळत राहिली...

सुजितने दुचाकी झाडाच्या सावलीत उभी केली आणि अनिरुध्द ला फोन लावला...''हॅलो, कुठे आहेस? आणि ते दोघे सुध्दा.''

“हॅलो, सुजित, अरे ऋतुराजच्या घरीच आहे...''

“तुम्ही तर लवकरच परत येणार अस सांगितलं होतं ना...''

“अरे हो पण ना अंघोळ तिघे आटोपून तयार झालो, तिकडे यायला निघणारच होतो  तर काकूंनी जेवण वाढलं मग काय जेवण झाल्यावर यायचं म्हटलं तर ऋतुराजला बँकमध्ये जावं लागलं...''

“अच्छा अस झालं तर, बरं ती आली होती आणि आताच परत गेली..''

“ती आली आणि परत गेली सुध्दा …! तिला जरावेळ थांबवलं का नाहीस?”

“तिची तब्येत ठीक नाही आणि आपलं काम झालं की.. डायरी मिळाली, बस् तुम्ही लवकर या..”

“अरे वा ! डायरी मिळाली..! तो परत आला की आम्ही सरळ दवाखान्यात येतो.."

“थांब, थांब असं कर तुम्ही तिघे बस् स्थानकाला या, आधी जरा बोलू मग बघू काय करायचं तर....”

“बरं ठीक आहे, तो आला की लगेच निघतो, फोन ठेवतो.."

“हो, मी इथेच वाट बघतो...”म्हणत त्याने कॉल कट केला..

## ४८. नवा गडी, नवा राज्य

जवळ जवळ ०५:०० वाजत आले, त्यांची वाट पाहत सुजितला जरा कंटाळा आला होता त्यात उन्ह चांगलंच तापत होतं... इतक्यात ते तिघे तिथे हजर झाले... दुचाकी वरून घाई घाईत खाली उतरून अनिरुध्द धावतच त्याच्या जवळ आला पाठोपाठ आर्यन आणि ऋतुराज

“सॉरी, यायला जरा उशीर झाला...”अनिरुध्द म्हणाला

“हो, खूप वेळपासून एकटाच इथे उभा आहे.. इतका वेळ लागतो का?”

“अरे बँकमधून पैसे काढायला गेलो तर तिथे चिक्कार गर्दी होती म्हणून उशीर झाला.”ऋतुराज ने स्पष्टीकरण दिले

“बरं असू दे...” सुजित

“हो असू दे, ती डायरी कुठे आहे? ते सांग आधी...”आर्यन

सुजितने त्याच्या पुढ्यात डायरी धरली, अनिरुध्द ने हातात घेऊन एक नजर फिरवली...”अरे पण आधी वाचणार कोण?”

“मी..”आर्यन

“मी का नाही?”ऋतुराज

“मला पण वाचायची आहे ना..!”अनिरुध्द

“आता काय करायचं..”सुजित

“आपण याचा विचार तर केलाच नाही”आर्यन म्हणाला, सगळे विचारात बुडाले, मध्येच हाताने चुटकी वाचवून ऋतुराज,”मला एक कल्पना सुचली, येथून जवळच एक शांत ठिकाण आहे मस्त ! तिथे जाऊया आणि एक जण वाचेल बाकीचे ऐकतील... आळीपाळीने वाचू....!”

हि कल्पना सर्वांनाच पसंत पडली आणि दुचाकी घेऊन ते चौघे ऋतुराज म्हणाला होता तिथे पोहोचले...”शहरापासून काही २ किलोमीटर अंतरावर लहानसा सार्वजनिक बगीचा, सकाळी सकाळी लोक असेच पायी चालत इकडे फिरायला येतात, कुणी सायंकाळी सुद्धा येतात...”तो म्हणाला आणि ते आत येऊन लॉनवर खालीच बसले.

“मग आता सुरुवात कोण करणार..?”सुजित ने विचारले

“मी....”अनिरुध्द म्हणाला सगळ्यांनी मान्य केलं की नंतर आर्यन, ऋतुराज आणि शेवटी सुजित कारण त्याने आधीच पूर्ण डायरी वाचली होती तसं तर त्याला आता वाचायला द्यायला नको असं पण मत मांडले गेले पण मैत्रीत सगळे सारखेच नाही का..! आता कुमारने डायरीत काय लिहून ठेवले ते कळणार म्हणून उत्सुकतेने त्यांचे चेहेरे जरा आनंदले, डोळे आसुसले... अधीरता संपली आणि अनिरुद्धने डायरीचं पहिलं पान उघडलं तर पहिल्याच पानावर गर्द लाल रंगाने

“मला काही सांगाचंय”

असं मोत्यासारख्या सुंदर अक्षरात एखाद्या पुस्तकाचं नाव लिहावं तसं लिहलेलं वाचून या डायरीत काय गुपित दडलं आहे अशी उत्सुकता शिगेला पोहोचली होती आणि त्याने ते पान बाजूला करून वाचायला सुरुवात केली... चार पाच पान वाचून झाली असतील तो मध्येच थांबला...

“काय झालं? पुढे वाच ना.!”ऋतुराज म्हणाला

“मला ना डॉक्टरांचे ते शब्द आठवले....”अनिरुध्द

“कोणते शब्द? ? ?”तिघांनी एकसाथ विचारलं जवळ जवळ जोरात ओरडून

“कुमारला त्याच्याबद्दल काही सांगण्या आधी आपण कोण आहे, हे त्याला कळायला पाहिजे आणि त्याचा आपल्यावर विश्वास बसला पाहिजे...”

“हो तर ते आपण भेटल्यावर त्याला सांगू ना... नव्याने ओळख करून देऊ जसे डॉक्टर म्हणाले...”आर्यन म्हणाला

“हो पण ना...”अनिरुध्द समोर काही बोलणार तोच ऋतुराजने त्याचे वाक्य मध्येच तोडत”ते नंतर बघू आधी डायरी

वाच ना”आर्यन आणि सुजितने पण सहमत असल्याचं सांगितलं,”वाच..”

“एक मिनिट माझं आधी जरा ऐकून घ्या प्लिज”अनिरुध्द

तिघांनी जरा त्याला बघितलं मग एकमेकांना नजरेनेच इशारा करत”हं बोल”

“एक गुपित अजून आहे.... डायरी सोबत त्याचपन आपल्याला माहीत असणं आवश्यक आहे....”अनिरुध्द

“काय? आणखी एक गुपित? ?”तिघे जवळ जवळ किंचाळले

“हो”असं बोलून त्याने सोनेरी क्षण म्हणजे आपल्या करीता एक भेट म्हणून कुमारने काहीतरी लिहून ठेवले आहे, वेळ आल्यावर तो ते आपल्याला देणार होता तसेच त्याला हे

गुपित कसं कळलं ते सुद्धा त्याने त्यांना सांगितलं, आपला नव्याने कुमारला परिचय करून दिल्यावर त्याने आपल्याबद्दल जे काय लिहून ठेवले आहे त्याच्या मदतीने आपल्याला त्याला लवकर विश्वासात घेता येईल नाहीतर आपण त्याच्याशी बोलतांना नेमकं काय काय सांगणार हा पण प्रश्न आहेच ना... त्याने लिहून ठेवलेलं त्याच्या मनात कुठेतरी असणार हि आशा आहे तर ते आपण आधी वाचायला हवं असं मला वाटतं...

यावर जरावेळ चर्चा करून सर्वांना त्याच मत पटलं म्हणून त्यांनी अस ठरवलं की आज कुमारजवळ आपणच थांबायचं तर सुजित आणि अनिरुध्द सायंकाळी सर्वांसोबत घरी जाणार कारण ते गुपित कुठे दडलं आहे हे केवळ अनिरुध्द ला ठाऊक आहे तर तो गुपचूप सोबत घेणार.... आपल्या चौघांकरिता जेवणाचा डबा आणायचा या बहाण्याने त्यांच्या सोबतच घरी जायचं तोवर आर्यन, ऋतुराज दवाखान्यात थांबणार अस नक्की झालं..

सध्या तरी डायरी वाचायला मिळणार नाही म्हणून तिघेपन निराश झाले, आधी आपल्याबद्दल काय लिहून ठेवले आहे हे जाणून घ्यायची त्यांना जास्त उत्सुकता निर्माण झाली. ते दवाखान्यात परत जायला निघाले, तिथे पोहोचल्यावर जे काय करायच त्यांनी ठरवलं होतं तसं करण्यास सुरुवात झाली...

आर्यन, ऋतुराज तिथेच थांबले तर बाकी सर्वजण घरी जायला निघाले. संधी मिळताच अनिरुध्द ने सोनेरी क्षण हि त्यांच्यासाठी लिहून ठेवलेले भेटस्वरूपी गुपित , जेवणाचे डबे सोबत घेऊन दवाखान्यात परत आले... काहीवेळ असंच ते गप्पा मारत बसले मग जेव्हा घड्याळात रात्रीचे ९ वाजणार होते तेव्हा कुमारला जेवण देतांना त्यांनी मित्र असल्याचा त्याला नव्याने परिचय करून दिला... जरासं त्याच्याशी बोलून ते रूममधून बाहेर पडले, त्यांचे चेहरे नजरेसमोर पुन्हा आणत काही आठवतं का? म्हणून त्याने सहज प्रयत्न केला पण काहीच उपयोग झाला नाही, औषध घेतल्यावर त्याला लवकरच झोप लागली...

तर बाहेर कँटीनला जाऊन त्यांनी सुध्दा जेवण आटोपलं आणि ते परत त्याच्या रुमजवळ आले... रात्रीचे १० वाजून गेले, सगळीकडे नीरव शांतता पसरली आता आपण वाचायला सुरुवात करू शकतो अशी त्यांची खात्री पटली मग अनिरुध्द ने कुमार भेट म्हणून कधीतरी जे त्यांना देणार होता ते सर्वांसमोर बाहेर काढले. मस्त सोनेरी रंगाच्या पेपरचे कव्हर लावून त्यावर चौघांचे नावं लिहिलेले वाचून त्यांचे मन आतुरले, नजर जशी कधी एकदा वाचायला मिळते म्हणून अतिउत्सुक झाली तेव्हा प्रत्येकाला त्याच्या नावाची भेट देऊन अनिरुध्द,''चला तर मग, आता वाचायला सुरुवात करूया...''त्यावर नजरेनेच होकार देत त्यांनी कव्हर काढले तर आत लहान १०० एक पानांचे रजिस्टर ! तर पहिल्या पानावरील मजकूर सारखाच...

दोस्ता, तुझ्या आयुष्यातील काही असे क्षण जे तुला पुन्हा जगावेसे वाटतील, कदाचित तुलासुध्दा आठवण असतील तरी या निमित्याने मी तुला काहीतरी वेगळं देऊ शकलो इतकंच काय ते  समाधान म्हणून माझ्याकडून हि तुला भूतकाळात

विलीन झालेल्या क्षणांची एक नव्याने आठवण करून देणारी भेट !!!

पहिलं पान जरी सारखं असलं पण पुढील पानांवर लिहिलेलं वेगवेगळं असणार याची त्यांना जाणीव झाली तेव्हा जरा अंतरावर काहीसा एकांत अनुभवता येणार म्हणून ते दूर दूर बसले. कुमारच्या रूम लगतच्या भिंतीला लागून असलेल्या बेंचवर अनिरुध्द, तेथून काही अंतरावर असलेल्या एका खुर्चीवर सुजित, काही अंतर ठेवून एका बाजूला असलेल्या बेंचवर आर्यन तर समोरच्या गॅलरीत एक खुर्ची सोबत घेऊन ऋतुराज असे चार जण जागा घेऊन बसले... त्यांनी वाचायला सुरुवात केली.

## ४९. सोनेरी क्षण - अनिरुध्द

तुझ्याबद्दल लिहायला सुरुवात करतो म्हटलं तर पहिला प्रश्न मलाच पडतो की आपण नेमकं कधी भेटलो आणि आपली मैत्री केव्हा झाली? बऱ्याचदा विचार केला पण आठवत नाही, प्रश्न अजून तसाच आहे... असो।

आपण जेव्हा उन्हाळयाच्या सुट्टीत भेटायचो, मस्त पैकी गप्पागोष्टी, खेळता खेळता वेळ कसा निघून जायचा कळायचं नाही असंच अधून मधून आपली फक्त सुट्टीच्या दिवसात भेट व्हायची जेव्हा तुझी दहावीची परीक्षा नुकतीच संपली होती आणि तू गावी परतून आला होता. आपण तेव्हा खूप मौजमजा केली, चिंचा, आंबे तोडायला आपण जात होतो हे सगळं नेहमीचंच ! तुझं चेस चं वेड मला पण लागलं होतं तासन तास चेस खेळतांना निघून जायचा तर आपल्यासारखे चेस खेळणारे पत्ते पण तितकंच मन लावून खेळायचे अस कुणाला सांगितलं तर त्यांचा बिलकुल विश्वास बसणार नाही... यावेळी तुला दहावीचा निकाल लागला की कॉलेजला प्रवेश घ्यायचा होता,

बऱ्याच गोष्टी शिक्षकांकडून समजून घ्यायच्या म्हणून जास्त दिवस गावी राहायला जमलं नव्हतं. दहावीचा निकाल लागला तेव्हा तू फोनवर मला सांगितलं होतं तू खूप आनंदी होता... परीक्षेत तुला अपेक्षित यश मिळाले होते आणि तुला हव्या त्या कोर्सला, कॉलेजला प्रवेश मिळाला होता सर्व कसं मनासारखं होत होतं... अधून मधून आपलं फोनवर बोलणं व्हायचं कॉलेजच्या गमती जमती तू सांगायचा, बोलतांना वेळ कसा निघून जायचा कळत नव्हतं पण बोलणं संपू नये असंही खूपदा झालं होतं...

एक दिवस असंच रात्री उशिरा तुझा फोन आला होता, मला अजून हि आठवतं की तू म्हटलं होतं,"इतक्यात कुणीतरी आयुष्यात आलं आणि बरंच काही बदलून गेलं, पण ना मला हे सगळं तुला समोरासमोर भेटल्यावर सांगायचं आहे.. अगदी पहिल्या क्षणापासून...!"मी त्यावर खूप आतुरतेने तुला विचारलं होत की आत्ताच सांग तर"फोन पर वो मजा नही"हसतच तू बोलला होता आणि मला आपण कधी भेटणार आणि तू एकदाच कधी मला सर्व सांगणार म्हणून वाट बघत

होतो, एक तो दिवस उगवला, सेमिस्टर मध्ये दिवाळीला जास्त सुट्या मिळत नाहीत तरी तुला पण कधी एकदा मला भेटून सांगतो अस झालं होतं, म्हणून दुसऱ्याच दिवशी सकाळी सकाळी लवकरच तू गावी आला होता. मला समोर बघून तू सरळ मिठी मारली,''कुमार, कुमार कधी एकदा तुला भेटतो, मन मोकळं बोलतो अस होऊन गेले''

"मलापण तुझ्या भेटीची खूप आतुरता लागली होती.."

"बरं, चल मस्त कुठेतरी शांत ठिकाणी जाऊन बसू आणि निवांत बोलू."

मग आपण पायी पायी चालत निघालो होतो, तू सांगायला सुरुवात केली होती तेव्हा तुझ्या चेहऱ्यावर वेगळाच आनंद मला दिसला होता... जरासा अंदाज आला होता की बहुतेक तुझ्या आयुष्यात कुणीतरी खास मुलगी आली.

कुमार, सर्वकाही बदलायला लागलं होतं तर सुरुवात नेमकी कधी झाली.? हं आठवलं कोर्स कोणता मिळाला आणि

कोणत्या कॉलेजला माझा नंबर लागला म्हणून मी मेरिट लिस्ट बघायला गेलो होतो, तिथे बरीच गर्दी जमली होती पण अचानक आलेल्या तोरड्यांच्या आवाजाने, मन इतकं बेचैन झालं की आधी अस कधीच वाटलं नव्हतं, आवाज नेमका कोणत्या दिशेने येत होता म्हणून मी नोटीस बोर्डजवळून बाजूला झालो तर मुलीच्या घोळक्यातून एक मुलगी घाईघाईने पाठमोरी जातांना दिसली, तिला बघायची खूप इच्छा झाली होती.. का असं वाटलं होतं? माहित नाही.. पण ती खूप जास्त घाईत होती म्हणून तिला बघता आलं नव्हतं, मग मी मेरिट लिस्ट बघून घरी आलो मला हवा तो कोर्स मिळाला होता, मन आनंदी झालं होतं पण ना ती एक नजर दिसायला हवी होती असं दिवसभर मनात येत राहिलं आणि पूर्ण रात्र जणू काही तो आवाज घुमत राहिला होता.. तो माझा भास होता की काय हे पण नीट तेव्हा समजलं नव्हतं …

दुसऱ्या दिवशी कॉलेजला प्रवेश घ्यायचा म्हणून मी लवकरच घरून निघालो होतो आणि ऑटो स्टॅन्ड ला पोहोचलो होतो. इतक्या सकाळी प्रवासी नव्हते म्हणून ऑटो बऱ्याच वेळा

जागीच थांबून राहत होते म्हणून मी ज्या ऑटोमध्ये दोन तीन जण बसून आहे आणि पटकन तो ऑटोवाला जायला निघेल म्हणून वाट बघत थांबून होतो तर इतक्यात मित्राचा फोन आला, मी त्याच्याशी बोलत होतो, अचानक मला तोच तोरड्यांचा आवाज ऐकू आला होता, सकाळी जास्त वाहनांची वर्दळ असते ना तरी मला तो आवाज स्पष्ट ऐकायला आला होता.... मी पटकन मान वळून पाहिले तर मोबाईल खाली पडला, पडलेला मोबाईल उचलायला वाकलो तर बहुतेक कालचीच ती मुलगी होती, असं मला वाटलं होत तेव्हा घाई घाईत मी तो मोबाईल उचलून ऑटोच्या दिशेने निघालो पण ना तेवढ्या वेळात ऑटो निघून गेला होता अन जरा ओझरती मला ती दिसून आली होती.... चेहऱ्याला पूर्ण स्कार्फ बांधलेला होता तर चेहरा दिसलाच नव्हता. कॉलेजला गेल्यावर कदाचित दिसेल या आशेने जरा विचार करत काही वेळाने कॉलेजला पोहोचलो होतो पण ऍडमिशन घ्यायला खूप गर्दी होती आणि रांगेत उभे राहून दोन तास झाले तेव्हा माझा नंबर लागला होता. जवळपास बराच वेळ झाला होता पण ती कदाचित कॅम्पस मध्येच असणार एक नजर दिसली तर दिसली या बहाण्याने म्हणून कॉलेज सुध्दा बघून घ्यावं असा विचार करून एक तास

असाच इकडून तिकडे भटकत राहिलो होतो... पण नशीबच नव्हतं की काय? ती काही दिसली नव्हती... ऍडमिशन मिळाली याचा आनंद तर होता पण मन काहीसं उदास झालं होतं.

ऍडमिशन झाल्यानंतर जवळपास १५ दिवसांनी कॉलेज सुरु झालं होतं, पहिलाच दिवस सर्वजण आपापल्या आवडीनुसार कपडे घालून आलेले, कॉलेज कसं एखाद्या बागेत विविध रंगेबेरंगी फुलं आणि ुलपाखरं जमावे अस भासत होतं... सवयीने मी तिसऱ्या रांगेत बसलो होतो, पहिलाच लेक्चरला मॅडम आल्या होत्या तर आज परिचय करून देणार आणि सर्वांचा परिचय करून घेणार आहे याची आम्हाला कल्पना होतीच... मॅडमने त्यांचा परिचय सांगायला सुरुवात केली, मुलं आपापसांत कुजबुज करत होती मी बाजूच्या मुलाशी ओळख करून घ्यायची आणि समोर जाऊन काय बोलणार आहे म्हणून हळू आवाजात बोलत होतो.. घाईघाईत चालत आल्याने तोरड्यांचा वेगळाच नाद यावा असा आवाज जरा ऐकू आला होता, क्षणात तो आवाज बंद झाला अन पाठोपाठ”may I come in?”अस कुणीतरी विचारलं...

माझी नजर दाराकडे वळणार तितक्या वेळेआधीच कित्येकांची नजर तिच्याकडे खिळली होती, तर मॅडमने हातानेच इशारा केला आणि आत बोलावून, तिलाच डायज वर यायला लावलं होत, तिच्यापासूनच introducton ला सुरुवात झाली होती... मला राहून राहून वाटत होत की ही तीच मुलगी आहे... जिला बघण्यासाठी मी आतुर झालो होतो, ती आज अशी अचानक समोर आली होती... मला विश्वास बसला नव्हता की ती माझ्याच वर्गात आली होती आता ती नजरेसमोरच राहणार होती... तिच्या उभं राहण्यात एक आत्मविश्वास दिसून येत होता, केस जास्त लांब नव्हते एक दम खूप लहान पण नव्हते, चेहऱ्यावर कुणालाही बघत राहायला लावेल अस तेज, बोलके डोळे, yellow कलरचा टॉप, ब्लू कलरची जीन्स जरा शॉर्ट, त्यामुळे गोरे पाय त्यात घातलेल्या तोरड्या आणखीच सुंदर दिसत होत्या, पायात सॅडल साधी हिल असलेली... तिने बोलायला सुरुवात केली होती"Good morning Madam and my dear friend, my name is Manasi....................... Thank you for giving

opportunity to me to introduce myself इतकं बोलून ती थोडंस हसली, सर्वांनी तिच्यासाठी टाळ्या वाजवल्या होत्या त्यामागे दोन कारण होती पहिलं म्हणजे पहिल्याच दिवशी उशिरा आली असून तिने उत्तम असा स्वतःचा, तो ही इंग्लिश मध्ये परिचय दिला होता आणि दुसरं म्हणजे दहावीत तिने 98 % मिळवले होते... थोडक्यात काय तर ती म्हणजे Brain with beauty combination...! ती खाली उतरून पहिल्याच रांगेत बसली होती...

पहिलाच दिवस असल्याने लेक्चर्स झाले नव्हते तर कॉलेज सुध्दा दिवसभर झालं नव्हतं पण ना, पूर्ण वेळ मी तिला एक नजर बघत होतो... तिला अस बघणारा मी एकटा नव्हतो तर बरेच जण होते, तिच्याशी मैत्री करायला खूप मुली आणि मुलं उत्सुक होते काहींनी पहिल्याच दिवशी तिच्याशी ओळख करून घेतली होती पण तिच्या समोर जाऊन बोलणं मला जमलं नाही माझी तिच्याशी ओळख करून घ्यायची इच्छा तशीच राहिली होती, कॉलेज नियमित सुरु झालं होतं आणि एक आनंदाची गोष्ट म्हणजे तिचा आणि माझा स्टॉप एकच होता

कॉलेजला जायला आम्ही एकाच ऑटोस्टोपवरून जात होतो, कधी कधी एकाच ऑटोतून जायचा योग आला होता पण बोलायची हिम्मत झाली नाही... एक दोन महिने असेच निघून गेले होते पण मैत्री तर दूर राहिली अजून आमची साधी ओळख पण झाली नव्हती... पण रोज तिला लेक्चर्स सुरु असतांना लपून छपून बघत होतो, अस तिला बघणं आवडायला लागलं होतं, तिच्या हालचाली, ती मुलींशी बोलतांना हसायची, हातवारे करून कधी काही समजवायची तेव्हा तिला बघत राहाव असं वाटत होतं.. संपूर्ण दिवस नजर आणि मन तिचा जणू पाठलाग करत होते तर घरी परतून आल्यावरही मी तिच्याच विचारात रमत होतो... तिला आठवून मन आनंदी व्हायचं, ती दिसली नाही तर कधी खूप बेचैन व्हायचं.. असं का होत आहे? हा प्रश्न पडला होता, तुला हे सगळं सांगतो म्हटलं तर फोनवर सांगीतल्यापेक्षा समोरासमोर बोललो तर मस्त ! म्हणून तुला भेटायची खूप जास्त उत्सुकता लागली होती...

तुझं सर्व ऐकून घेतल्यावर आपण अस ठरवलं होतं की सध्या हे नेमकं काय होत आहे याचा विचार करणं सोडून

द्यायच.. ती मुलगी तुला आवडते इतकं आपण समजून घेऊन तिच्याशी मैत्री करायची अस सुरुवातीला ठरवलं होतं... सर्वात आधी ओळख करून घेणे आवश्यक आहे नंतर एकमेकांशी संपर्क आले की आवडी निवडी , स्वभाव, विचार कळतात. तसेच बोलणं सुरु झालं की समजून घ्यायला सुरुवात होते... इतकंच काय ते ठरवून त्यावेळेच्या दोन तीन दिवसांच्या भेटीत काहीतरी नवीन गोष्टी जीवनात आनंद घेऊन येणार या अपेक्षेने तु परत गेला होता...

तु भेटून जायला जवळपास एक आठवडा झाला होता तर एक दोन वेळा फोनवर तुझ्याशी असच अवांतर कॉलेज वगैरे कसं सुरु आहे आणि बाकी घरी सर्व ठीक आहे की नाही असं काहीसं बोलणं झालं होतं... एक दिवस रात्री अचानक तुझा फोन आला होता,''कुमार, आज तर कमाल झाली, क्लासचे दोन दोन विद्यार्थी प्रॅक्टिकल साठी लॅब मध्ये निवडले होते तर काय झालं माहित आहे.?''

मी उत्सुकतेने''काय झालं? ‘‘म्हणून विचारलं होतं

“ती माझ्यासोबत प्रॅक्टिकल साठी होती, माझे हात थरथरत होते आणि प्रॅक्टिकल करताना माझ्याकडून जरा गडबड पण झाली होती पण ना तिने मदत केली... सर्व ठीक झालं होतं तिला इतक्या जवळून बघितलं तर वेगळंच जाणवलं, शब्द नाहीत की नेमकं त्यावेळी कसं वाटलं होतं आणि लॅबमधून बाहेर पडलो तर ती स्वतःहून बोलली, आज ओळख झाली..”तेव्हा मला सुध्दा आनंद झाला होता.

पुन्हा दोन एक दिवसांनी तुझा फोन आला होता तु सांगितलं होतं की,”एकमेकांशी थोडं थोडं अभ्यास आणि इतर बाबतीत बोलणं होतं असतं, तिचा सहवास आवडत आहे आणि ती टॉपर जरी आहे पण मनमिळाऊ आहे.. आम्ही कॉलेजला सोबतच जात असतो, परत येतांनी सोबतच येत असतो गप्पा गोष्टी करत करत...! काही अडचण असली की ती मला मदत करते आणि तिला कधी आवश्यकता असली की ती स्वतःहून मला विचारते... पहिल्यांदा कुणी मुलगी मैत्रीण म्हणून आयुष्यात आली आहे.. पण मैत्रीण पेक्षा जास्त आहे, इतक्यात नेमकं काय तर समजत नाही फक्त सर्व छान आहे,

हवंहवंसं वाटणार अस काही घडत आहे.. काही दिवसांत पहिल्या सेमिस्टर परीक्षा होणार आहे नंतर सुट्ट्या नाहीच्या बरोबर आहेत, लगेच दुसरं सेमिस्टर सुरु होणार आहे...”

असं कुमारने लिहिलेलं वाचत असता अनिरुध्द मध्येच थांबला, त्याने आमच्या आठवणी इतक्या मनात साठवून कश्या काय ठेवल्या? आणि भेट म्हणून लिहून ठेवायचं हे पण जरा अनपेक्षितच ! कुमार तु खरंच वेगळाच आहेस... जरावेळ तो विचारात बुडाला मग पुढे वाचायला लागला रात्र पुढे जात राहिली. तो भूतकाळातील आठवणींच्या मागे मागे.... !

## ५०. सोनेरी क्षण - सुजित

सुजित, तुला पण आठवण असेल आपण पहिल्यांदा कधी भेटलो..! मग विचार जुळत गेले आणि आपण जिवलग मित्र झालो, आहोत आणि राहणार... आपली मैत्री दिवसेंदिवस घट्ट होत गेली, तुला प्रश्न पडला असेल आपण तर कधीपन भेटू शकतो मग हे असं लिहून काय ठेवलं? आणि का? तर दोस्ता, वेळेसोबत काही गोष्टींचा विसर हा पडतोच हे तुझ्यापेक्षा जास्त कुणाला ठाऊक आहे ...! असो, तर ही भेट तुला नक्कीच आवडेल अशी अपेक्षा...

तसं लिहितो म्हटलं तर खुप काही आहे, रोजच आपली भेट होते आणि बऱ्याच वेळा आपण गप्पा मारत बसतो, कितीतरी वेळ चर्चा करताना निघून जातो. पण आपल्या गोष्टी काही संपत नाही, आपण शाळा, खेळ, भांडण, जेवण, कॉलेज किस्से, इकडे तिकडे फिरायला जाणं, खूप काही सोबत जगलो, जगत आहोत... तर भेट स्वरूपात तुला काही लिहून द्यायचं म्हटलं तर तुझ्या जीवनातील तिच्या येण्याने जे काय क्षण तुला

अनुभवायला मिळाले ते एकदा नव्याने जगता येतील म्हणून तेथून लिहायला सुरुवात करतो...

आपण बारावीला असतांना ची हि गोष्ट आहे, एक दिवस असंच कॉलेज वरून परत येतांना आपण गप्पा मारत होतो तर इतक्यात तु नवीनच सुरु केलं होतं, काही तरी सांगायचं आहे, काहीतरी सांगायचं आहे पण अजून ती वेळ आली नाही वेळ आली की सांगणार... त्यादिवशी तु विषय काढला की कुणीतरी आहे जी तुला खूप आवडते, एक मुलगी जिला नुसतं बघणं सध्या माझ्या नशिबात आहे पण मला तिच्याशी बोलायचं आहे तिला सांगायचं आहे की ती मला खूप आवडते... त्यानंतर मी तुला तिचं नाव विचारलं तर तु म्हणाला होता की,"आपण मित्र आहोत ना मग तुच ओळख की ती कोण आहे? दोन दिवस तुला वेळ देतो, तू जर बरोबर ओळखलं तर ठीक नाहीतर मी तुला सांगेल, मला मदत करशील हे हि मला ठाऊक आहे तर दोन दिवस आणखी वाट बघ, नाव शोधायला जमत की नाहीतर.."

खरं तर असं काही ऐकून मला जरा धक्का बसला होता, तुला तसं मी सांगितलं पण होतं.. खंत वाटली होती की जिवलग मित्राला आवडलेली, ती मुलगी कोण? हे काही मला शोधता आलं नव्हतं. दोन दिवसांनी तूच मला तिचं नाव सांगितलं होतं''माही''दहावी पर्यंत आपल्याच सोबत शिकलेली पण कधी तिच्याशी जास्त संपर्क आला नाही. आता ती वेगळ्या शाखेला ॲडमिशन असल्याने संपर्कात नव्हती पण ट्यूशन ला आपल्याच सोबत होती... तुला ती आवडते आणि ते पण शाळेत असतांना पासून हे जेव्हा तू सांगितलं तेव्हा तर आणखीच आश्चर्याचा धक्का बसला होता, तर आता तिला हे सांगायचं कसं? आणि तिला हे सगळं सांगितल्यावर काय वाटेल...? असे प्रश्न आपल्याला पडले होते तर त्यांची उत्तर काय? हे आपल्याला काहीएक माहित नव्हतं.

तुला ती आवडते हे कळल्या नंतर ट्युशन सुरु असतांना तिला तुझं चोरून चोरून एक नजर बघणं, पुन्हा अभ्यासात लक्ष लावणं मग परत तिला बघणं असं चालायचं... हे मला काहीसं समजायला लागलं होतं आणि तु स्वतःहून मला नंतर असं होत

असल्याचं सांगितलं होतं. खरंतर मला तेव्हा हसायला येत होतं पण तुझ्यासमोर मी हसलो नाही, असं काही तुझ्यासोबत घडेल याची काहीएक कल्पना नव्हती... तर तुझं मन माझ्याजवळ व्यक्त करताना काही गोष्टी तु सांगत होता की,"कितीही वेळा स्वतःला बजावलं की तिला अस बघायचं नाही पण नजर आपोआप तिच्याकडे वळते, मग तिला बघत राहावंसं वाटते, तिच्या हालचाली मन नकळत जपून ठेवतं, मनात तसं नसतं पण काही काही हावभाव मनावर ताबा घेतात आणि प्रत्येक क्षणाला ती जास्त आवडायला लागते... चेहऱ्यावर येणारे केस जेव्हा ती सावरते तेव्हा तिचे लांब लांब बोट खूप मोहक वाटतात, त्या केसांच्या लटा परत परत तिला छळायला जणू चेहऱ्यावर येतात, कधी तिच्याशी बोलणं झालं, ती आवडते असं तिला सांगता आलं, तिला माझं अस सांगणं जर योग्य वाटलं, तिने जर माझ्या भावना समजून घेतल्या तेव्हा मनमोकळं तिच्याशी बोलतांना तिला सांगायचं आहे की, ' तुझ्या चेहऱ्यावर येणारे केस मागे सारत जाऊ नकोस ते तसेच खूप छान दिसतात...'

आपण भेटलो की तू स्वतःहून विषय काढत होता, तिच्याबद्दल काय काय वाटत ते सर्व तू मला सांगायचा... हे अस तिची तारीफ करणं, ती तुला खूप आवडतं अस सांगणं जणू रोजचंच झालं होतं.. ट्यूशन संपली की तिच्या मागे मागे आपण सुध्दा घरी जात होतो पण तिच्याशी बोलणं काही आपल्याला जमत नव्हतं तर तो दिवस मला अजूनही चांगलाच आठवण जेव्हा ट्यूशन संपल्यावर आपण घरी जायला निघालो होतो पण तु तिला थांबलेली बघून मागेच राहून ती का बरं थांबली? हे जाणून घेण्यासाठी वाट बघत जागीच उभा होता. आपल्या बॅच मधला अंकुश नावाचा मुलगा तिला नोट्स देत होता आणि ते जरावेळ गप्पा मारत होते, ते बघून तू खूप चिडला होता आणि तेव्हाच तेथून निघाला होता... आपण घरी जायला सोबतच निघालो होतो पण तू एक दम गप्प झाला होता, चेहऱ्यावर काहीसा राग दिसून येत होता, मी तुला विचारलं होत पण तेव्हा तू काहीही बोललाच नव्हता.. घरी आल्यावर सायंकाळी आपण या विषयावर बोलू इतकंच ठरलं होतं, मग सायंकाळी आपण असच पायी पायी चालत गावाच्या वेशीजवळ जाऊन बसलो होतो, तेव्हा तु सांगितलं होतं...

“कुमार, तुला माहित आहे ना मला ती खूप आवडते...”

“हो, सुजित मला माहित आहे..”

“कुमार, तिला नुसतं बघत राहणं, तिचे हावभाव जोपासणं, आवडत.. पण ना तिच्याशी बोलायची खूप इच्छा आहे, तिच्याबद्दल जे मला वाटतं ना ते मला तिला सांगायचं आहे... आज जेव्हा तिला अंकुश सोबत बोलतांना बघितलं ना, मला कसतरी वाटलं... खूप राग आला होता, तिचा त्याचा की स्वतःचा ते माहित नाही बस् काहीएक बोलायचं नाही असं वाटत होत म्हणून तेव्हा तुला सुध्दा काही सांगू शकलो नाही, यासाठी मला माफ कर, तेव्हा डोकं पार कामातून गेलं होतं...”

त्यावर मी तुला विचारलं होत इतकं वाईट वाटून घेण्यासारखं किंवा डोकं खराब करून घेण्यासारखं नेमकं काय झालं होतं, तेव्हा तू म्हणाला होता की,’’त्यांना बोलतांना बघून

मनात कितीतरी प्रश्न निर्माण झाले होते, माही आणि अंकुश मित्र आहे की अजून काहीतरी नातं त्यांच्यात आहे? तिला तो आवडत असेल का? त्याला सुध्दा ती आवडत असेल तर.... एकमेकांना ते दोघे आवडत असणार तर? काहीवेळ अस वाटलं की तिला मिळविण्याआधीच मी तिला गमावलं की काय...!"

मी तुला म्हटलं होत की एकदा तरी तिच्याशी बोलण्याचा प्रयत्न करून बघू, पण तू टाळाटाळ करत होता म्हणून तुझ्या मनात तेव्हा ते विचार आले होते आणि यावर उपाय म्हणून आपण ठरवलं होतं की अंकुश सोबत मैत्री करायची मग त्याच्याकडुन नेमकं काय आहे, काय नाही? ते माहित करून घ्यायचं म्हणजे शंका दूर होईल... आपण तसंच केलं होतं जस ठरवलं होतं आधी अंकुश सोबत ओळख करून घेतली होती, बोलता बोलता तो आपला चांगला मित्र बनला होता... मग एकदा असंच एक रविवारी आपण त्याला आपल्या गावी जेवण करायला, जरावेळ शेत फिरायला जाऊ, सुटीचा दिवस सोबत घालवू म्हणून बोलावलं होतं त्यामागे खरंतर आणखी एक कारण होतं आणि ते म्हणजे माही आणि त्याचं नेमकं नातं काय

हे पण आपल्याला जाणून घ्यायचं होतं, तर ठरल्याप्रमाणे तो तुझ्या घरी आल्यावर जेवण वगैरे आटोपून आपण तिघे शेतात फिरायला गेलो होतो.. गप्पा गोष्टी करताना सहज तू त्याला माहिला ओळखतो का? अस विचारलं होतं तेव्हा त्याने स्वतःहून सर्व काही सांगितलं होतं की''ती खूप चांगली मुलगी आहे, आधी आम्ही मित्र मैत्रिण झालो, ती मला भाऊ मानते आणि मी तिला बहीण...!''त्याच अस बोलणं ऐकून तू खूप खुश झाला होता, तो आनंद त्यावेळी तुझ्या चेहऱ्यावर दिसून आला होता...

त्यादिवसाच्या भेटीनंतर आपण आणखी चांगले मित्र बनलो होतो, त्याच्या बोलण्याने तिच्याबद्दल तुझ्या मनात जी आवड होती ती आणखी वाढली सोबत तिच्याबद्दल आदरभाव निर्माण झाला असंही तू मला सांगितलं होतं, ऐकून मलाही आनंद झाला होता... तिच्याशी बोलणं कसं होईल हा प्रश्न अजून तसाच होता तर सहज मैत्री करावी म्हणून तरी एकदा बोल म्हटलं पण तुला काही ते जमलं नव्हतं... तेव्हा नशिबानेच आपली साथ दिली होती, तू मी आणि अंकुश ट्यूशन

संपल्यावर बाहेर बोलत थांबलेले होतो तेव्हा ती जायला निघतांना थांबली,”अंकुश, अजून गेला नाहीस? माझ्यासाठी थांबला होता का? नोट्स वगैरे पाहिजे आहेत का?”तिने अंकुशला विचारलं होतं...”माही, काम वगैरे काही नाही, बस् सहज बोलत थांबलो, इतक्यातच आमची मैत्री झाली ना, तर जरावेळ गप्पा मारत बसलो...”

“हो का, आम्ही ओळखतो हा, एक मेकांना शाळेपासून सोबत होतो, जास्त बोलत नाही इतकंच... हो ना कुमार, सुजित..”आपल्याकडे बघून ती बोलली होती....”हो माही..”मी म्हणालो होतो तू नजरेनेच जणू हो म्हटलं होतं.. त्यावर,”अरे वा ! छान आहे की आता आपण चारजण मित्र झालो...”अंकुश म्हणाला होता... माझं लक्ष तुझ्याकडे होत तू तिला नजर रोखून बघत होता आणि किंचित इकडे तिकडे नजर फिरवत होता... नंतर तू सांगितलं होतं की पहिल्यांदा तिला इतक्या जवळून बघितलं होत म्हणून बोलायला सुचलं नव्हतं..

अस कुमारने लिहिलेलं वाचून सुजित भावूक झाला,’’कुमार, माझ्या आयुष्यातील हे अनमोल क्षण तू जपून ठेवले, सर्वकाही तुला आठवण कसं राहील याच नवल वाटत आहे, तू सच्चा दोस्त आहेस... माझं सर्व तुला माहित  आहे पण तुझ्याबद्दल च तू मला न सांगता डायरीत का लिहून ठेवले हा प्रश्न पडला आहे’’स्वतःशीच बोलत तू जरावेळ आठवणीत हरवला. काही वेळाने भानावर आला त्याने पुढे वाचायला लागला...

## ५१. सोनेरी क्षण - आर्यन

सर्वजण आपापल्या जीवनातील ते अविस्मरणीय क्षण कुमारने भेट म्हणून दिलेल्या”सोनेरी क्षण”वाचत असताना पुन्हा ते सारं नव्याने अनुभवू लागले. आर्यन ने सुध्दा वाचायला सुरवात केली होती… त्याला सगळं नजरेसमोर जणू दिसायला लागलं, कुमारशी कॉलेज मध्ये असतांना भेट झाली मग विचार आवडी जुळल्या, मैत्री झाली आणि कोणत्या एक अनामिक क्षणाला ते मैत्रीचं नातं जिवलग मित्र म्हणून दोघांच्या मनात रुजलं… कुमारने लिहिलेलं वाचतांना प्रत्येक क्षणाला तो भूतकाळशी एकरूप होऊन गेला, नव्याने ते पुन्हा एकदा जगायला मिळेल म्हणून आतुरतेने तो पुढे वाचायला लागला…

आर्यन, आपलं मैत्रीचं नातं उशिरा, नकळत जुळलं पण तुझ्या बाबतीत अस काहीच नसेल जे मला माहित नाही. काहीसं असू पण शकत, तर तुला जिवलग मित्र या नात्याने हि छोटीशी भेट देतांना आनंद होत आहे जरा वाईट सुध्दा वाटत आहेत कारण जीवनातील असे काही क्षण जर पुन्हा एकदा

वाचनातून जगायला आवडतील पण काही क्षण असेही आहेत ज्यांची साधी आठवण करावी अस वाटत नाहीत ते नेहमीसाठी विसरायला हवे असे तुला वाटायचं पण दोस्ता भूतकाळ काही आपली पाठ सोडत नाहीत आणि वास्तविकता चांगली अन वाईट दोन्ही बाजूने स्वीकारावी लागते... तुला सुध्दा हे मान्य आहे म्हणून मन मोकळं लिहत आहे...

आपली भेट झाली तेथून लिहायला सुरुवात करतो, पदवी चं पहिलं वर्ष.. कॉलेज मध्ये जवळपास सर्वजण अनोळखी होते तर क्लासमध्ये काही जण ओळखीचे तर काही पुन्हा अनोळखी... मी कॉलेजला यायला जरा उशिराच सुरुवात केली होती, लेक्चर्स सुरु होऊन जवळपास एक महिना होत आला होता, म्हणून मी शेवटच्या बेंचवर बसायचो, जास्त कुणाशी बोलणं हिट नव्हतं तर काही दिवसांत समजलं की माझी वर्गप्रतिनिधी म्हणून निवड झाली, शिक्षक पहिल्या बेंचवर बसायला सांगत तेव्हा तुझ्या बेंचवर नेहमी जागा खाली असायची म्हणून तुझ्याजवळ बसायचं ठरवलं होतं. हळूहळू आपली ओळख झाली, तशी सर्वांशी झाली होती पण मैत्री

आधी तुझ्याशी झाली होती... तुझे विचार, स्वभाव काहीसा सारखाच होता की काय म्हणून, की अजून काही कारण होत माहित नाही लवकरच आपण जिवलग मित्र झालो होतो...

तर आर्यन, तुझ्या जीवनात आनंद घेऊन यायचं पहिलं कारण म्हणजे कॉलेज हेच होतं, काही घरगुती कारणांमुळे तुला मध्येच शिक्षण सोडावं लागलं होतं तर दुसरं कारण म्हणजे''ती''तिच्याबद्दल मलाही जरा उशिराच तू सांगितलं होतं, कॉलेज सुरु असताना आपण सोबत बसायचो पण तू कधी अस मला सांगितलं नव्हतं तर जेव्हा NSS कॅम्प जाणार होता त्याआधी असंच अवांतर बोलणं सुरु असतांना तू म्हणाला होता की क्लासमध्ये एक मैत्रीण आहे, पण ती मैत्रीणपेक्षा जास्त वाटते... तिच्याशी बोलायला, तिला बघायला मन आतुरलेलं असत म्हणून मी रोज लवकर कॉलेजला येतो आणि तिच्याशी बोलत बसतो, अस काही ऐकून मी जरावेळ आश्चर्यचकित झालो होतो, तर जेव्हा मी तुला विचारलं होत की कधीपासून हे सगळं सुरु आहे? तुझ्या उत्तराने मला धक्काच बसला होता, तू म्हणाला होता की कॉलेजच्या पहिल्या दिवसापासून तू

तिच्याशी रोज बोलत होता... यावर मात्र माझा विश्वास होता कारण तुझा स्वभाव अगदी मनमिळाऊ...! सगळयांत मिळून मिसळून राहण्याची तुझी आवड, सवय..!

तेव्हा मी तुला ती कोण आहे? मला सांग म्हटलं होत तर तू कॅम्प वरून परत आल्यावर पूर्ण स्टोरी सांगतो अस म्हणाला होता तेव्हा विषय टाळला होता... पण नशिबात अस काहीतरी होणं लिहून ठेवले होते हे आपल्याला कुठे ठाऊक होतं... ते सात दिवस जरा कंटाळवाणे होते कॉलेजला लेक्चर्स होत नव्हते, तू कॅम्प ला गेला होता जास्त कुणाशी बोलणं होत नव्हतं, तू परतून आला आणि तुझी दुसऱ्या दिवशी भेट झाली होती पण जरा निराश वाटत होता, मी तुला कारणं विचारलं होतं तेव्हा तू निवांत कुठेतरी बसू मग बोलू अस म्हटलं होत...

आपण माझ्या घरी आल्यावर बाहेर फिरायला गेलो होतो, तेव्हा तू सांगितलं होतं..''कुमार, घरची परिस्थिती जरा मध्यम आहे म्हणून बारावी नंतर काम करून घरची जबाबदारी स्वीकारली, बाहेर ठिकाणी कामाला गेलो होतो पण तिथे दोन

वर्षे काम करून समजलं की शिक्षणाशिवाय माणसाला किंमत नाही, पुढे शिकायचं नोकरी मिळवायची अस ठरवलं अन परत आलो, कॉलेजला ऍडमिशन घेतली, कॉलेजचा पहिलाच दिवस... मनात खूप काही प्रश्न होते दोन वर्ष या वातावरणापासून दूर होतो तर मन लागेल का? पुन्हा कॉलेज वगैरे जमेल की नाही? बाकीचे माझ्यापेक्षा लहान असतील... अभ्यास होईल की नाही पेन पुस्तक दोन वर्ष्यापासून हातात घेतले नव्हते... याच विचारात कॉलेज जवळ पोहोचलो होतो, समोर एक मुलगी गेटमधून आत जातांना दिसली होती तिने नकळत मागे वळून पाहिलं, कॉलेजचा पहिलाच दिवस युनिफॉर्म नव्हता साधा पेहराव पंजाबी ड्रेस तिने घातला होता, हिरवा आणि लाल जरा मेहंदी रंगाचा असा... केसांना एक चिमटा लावला होता बाकी सर्व केस मोकळे केले होते, चेहऱ्यावर हसू होतं, क्षणभर अस वाटलं की नवीन गोष्टी ची, हि नवीन जीवनाची सुरुवात आहे आणि हि मुलगी जर माझ्या वर्गात असली तर नियमित कॉलेज आणि मन लावून अभ्यासाचं कारण हीच होणार आहे..."

तुला मध्येच बोलतांना थांबवत,"अस्सस, तर पहिल्याच दिवशी तूला ती आवडली आणि तुझ्यासाठी निम्मित सुध्दा झाली.. ! वा ! पुढे काय झालं.."

"हं पुढे ना, मग क्लासमध्ये आलो तर अजून कुणीच आलेलं नव्हतं म्हणून पहिल्याच बेंचवर बॅग ठेवली होती आणि दारात उभा राहिलो होतो तर वर्गाला दोन दार होते तिकडच्या दारात कुणीतरी मुलगी उभी राहून घड्याळात किती वाजले ते बघत होती म्हणून तो आडवा केलेला हात मला दिसला होता मोकळे केस वाऱ्यामुळे उडत होते मी मनोमन म्हटलं की ही तीच मुलगी असू दे अन मी जरा मागे सरकून वाकून दुसऱ्या दारात कोण आहे ते बघितलं तर तिच मुलगी होती, मला खूप छान वाटलं होतं... मग मी वेळ वाया न घालवता तिच्याशी ओळख करून घ्यायची म्हणून स्वतःहून बोललो होतो, जरावेळ असंच बोलत राहिलो होतो आणि मित्र बनायला आवडेल अस तिला सांगितलं होतं तिने होकार दिला होता मग काय पहिल्याच दिवशी मैत्री झाली होती..."

पुन्हा तुला मध्येच थांबवून,”आर्यन, तिचं नाव तर सांग...”

“हो, कुमार, सांगतो ना, तिचं नाव”कल्पना”

“अच्छा, कल्पना आपण ज्या रांगेत बसतो ती त्याच रांगेत बसते ना.."

“हो, बरोबर आहे पुढे सांगतो, रोज तिच्याशी भेट होते, आम्ही दररोज सकाळी बोलतो, मग ती आवडायला लागली, लेक्चर्स मध्ये कधी कधी तिला बघावस वाटलं की नजर आपोआप तिच्याकडे वळते... ती पण मी तिला बघत असल्याचं कळलं की जरासं हसते आणि समोर बोर्डकडे लक्ष देते, मैत्री झाली आहे पण तिला सांगावंसं वाटतं की, कल्पना, तुझ्याशी बोललो की दिवस कसा मस्त जातो, तुझं साधं राहणं, आपली नजरानजर झाली की हसणं हवंहवंसं वाटतं, तू मला खूप आवडते.. ' खरं तर कॅम्प वरून परत आल्यावर आधी तुला

सर्व सांगायचं मग तिला पण मनातलं बोलून टाकायचं अस ठरवलं होतं..."

इतकं बोलून तू गप्प बसला होता, काय झालं? अचानक गप्प का बसला? मी विचारलं होतं, तू सांगितलं होतं...''कुमार, कधी कधी ना आपण विचार काही करून ठेवतो पण नशिबी अजून काहीतरी व्हायचं असतं... माझ्यासोबत असच काही झालं, कॅम्प ला गेलो होतो ना, आपल्या क्लास मधला एक मुलगा सोबत होता तशी आधी आमची ओळख होती पण कॅम्प मध्ये लवकरच मैत्री झाली, आम्ही बराच वेळ घरच्या कॉलेजच्या गप्पा गोष्टी एकमेकांना सांगितल्या, त्याचा स्वभाव मस्त आहे, दिवसभर आम्ही सोबत असायचो तर खूप काही बोलणं व्हायचं, एक दिवस असंच बोलता बोलता त्याने सांगितलं की आपल्या क्लास मधली एक मुलगी त्याला आवडते... पण त्याला तिच्याशी बोलायला जमत नाहीये.''

परत तू बोलता बोलता मध्येच थांबला होता, मी विचारलं होतं,"आर्यन, पुन्हा का थांबला? कोण आहे तो मुलगा आणि ती मुलगी कोण आहे?"

"कुमार, तो मुलगा म्हणजे... तू त्याला ओळखत असणार, तेजस आणि ती मुलगी दुसरी कुणी नसून कल्पना आहे..."

तेव्हा मला चांगलाच धक्का बसला होता, नेमकं हे काय आहे? असं कसं काय होऊ शकत? मनाला पटतच नव्हतं तर आता काय करावं हे दोघांपण माहित नव्हतं तू म्हणाला होता की,"मैत्रीच्या नात्याने त्याने सर्व विश्वास ठेवून मला सांगितलं, सर्व माहित असून मी तिला अस मनातलं इतक्यात कसं सांगू शकतो, त्याला काय वाटेल? त्याने मित्र समजून मला सगळं काही सांगितलं... म्हणून आता कल्पना आणि तेजस माझे मित्रच आहेत असं मानून जे आहे ते तसंच सुरु ठेवावं, मन व्यक्त करायचं नाही असं मी ठरवलं आहे..."

मला तुझं म्हणणं पटलं होत तसं मी तुला बोलून दाखवल होतं पण तेव्हा एक गोष्ट आणखी सांगितली होती की,"तेजसला पण कल्पना आवडते हे तुला नंतर कळलं, तुला ती खूप आधीपासून आवडते आणि महत्वाचं म्हणजे तिचं मन जाणून घेणं हे जरुरी आहे, तर तू तिच्याशी बोलायला हवं आणि तेजसला पण सांगायला हवं होतं... नंतर कधी माहित झालं तर गैरसमज व्हायचा..."तू म्हणाला होता की,"तुला कोणताच मित्र किंवा मैत्रीण गमावायच नाही आणि मी तेजस ची तिच्यासोबत ओळख करून देणार आहे, लवकरच त्यांची मैत्री होईल मग कल्पना जे ठरवेल ते होईल... मग निवड कुणाची पण होवो.."

तुझ्या या निर्णयामुळे सर्वकाही बदलून जाईल याची कल्पना तुला होती पण तुझी त्यागाची भूमिका तेव्हा मला समजली होती... मित्र म्हणून तुझ्याबद्दल खूप आदर वाटला होता, मित्रांसाठी स्वतःच्या इच्छा बाजूला सारून मनावर नियंत्रण ठेवण तुला कसं जमलं हाच प्रश्न मला पडला होता, तर तुझा हा निर्णय कोणते परिणाम करणार याची काळजी वाटली

होती, आणि तेच झालं होतं, अगदी अनपेक्षित जे व्हायला नको होतं...

आर्यन ने ते सोनेरी क्षण रात्रीच्या अंधारात काही अंधुक उजेडात वाचत असताना नव्याने अनुभवले, पुढे पुढे वाचतांना त्याला प्रश्न पडले की कुमार ने हे सर्व काही कसं काय लक्षात ठेवलं आणि ते हि सगळ्यांच्या बाबतीत..? इतकं जिवलग नातं तर रक्ताचं पण आजच्या मतलबी दुनियेत दिसून येत नाही.. काही वेळ तो विचार करत राहिला मग त्याने पुन्हा वाचायला सुरुवात केली..

## ५२. सोनेरी क्षण - ऋतुराज

रात्रीच्या वेळी अस काहीतरी वाचण्याची वेळ येईल अशी कुणीच कधी कल्पना केली नव्हती तर जीवन जगताना बरेच क्षण, वेळ, परिस्थिती आपल्या समोर येते की अस काही होईल याची अपेक्षा नसते तर सर्व वाचत असताना ऋतुराज देखील कुमारने त्याच्याबद्दल काय लिहून ठेवलं हे जाणून घ्यायच म्हणून ती भेट हाती घेऊन उत्सुकतेने वाचायला लागला... सोनेरी क्षण म्हणजे नेमकं काय लिहिलं असेल? या प्रश्नाचं उत्तर शोधत त्याने रजिस्टरचे पहिले पान बाजूला सारले जे सर्वांसाठी कुमारने सारखेच लिहिले होते... दुसरं पान वाचायला त्याने सुरुवात केली....

ऋतुराज, खरंतर मला हे नावं तितकंसं आवडत नाही म्हणून मी Rj हे nick name देऊन नव्याने तुझं नामकरण केलं होतं आणि तुला ते शोभते, मला मान्य आहे आपल्यावर वेळ, परिस्थिती, चांगले वाईट अनुभव, आजूबाजूचं वातावरण यांचा परिणाम होतो आणि त्यानुसार आपल्यात बदल होत असतात

पण कॉलेजला असतांना सोबत असलेला तू अन जीवनात तो जो एक प्रसंग येऊन गेला त्यानंतरचा तू अगदी विश्वास बसत नाही... इतका तुझ्यात बदल झाला आहे, मन मान्य करायला तयार नाही की असा काहीतरी प्रसंग, अनुभव कुणाला इतकं कसं काय बदलवू शकतो? त्या अनुभवानंतर तुझं संपूर्ण जीवन बदलून गेले... असो आता जे आहे ते महत्वाचं...! जे नाही त्याचा पश्चाताप करून उपयोग नाही...

कॉलेजला जरी आपली नव्याने भेट झाली होती पण ओळख जुनीच होती, तुझं बॉक्सिंग आणि कराटे चं वेड अगदी शालेय जीवनापासूनच...! सर्वांशी तुझं जरासच पटत होत पण मैत्री छान जमली होती, तुझ्याशी बोलता बोलता बरंच काही नवीन माहित व्हायचं, असंच एकदा पदवीच्या पहिल्या वर्ष्याला असतांना, मी तुझ्या घरी आलो होतो तेव्हा मला तू सांगितलं होतं,''कुमार, पँटच्या बेल्टमध्ये आणि पाकिटात फाईटर आहेत..''त्याआधी फाईटर हा शब्द तेवढा मला ठाऊक होता तर तुझ्या सोबत त्यादिवशी घरी आलो त्या निमित्याने

मला नजरेसमोर आणि हातात घेऊन ते चीजवस्तू बघायला मिळाली होती....

तो दिवस मला अजून ठाऊक आहे जेव्हा आपल्या क्लासमधल्या मुलीला कुणीतरी छेळलं होत तेव्हा भर चौकात दहा टपोरी पोरं असून तू एकट्यानेच त्याची कॉलर पकडून त्याला बेदम मारलं होतं. तुझा जिगरबाज स्वभाव, मित्रांसाठी कधीपन काहीपण करायला तयार... अशी तुझी छाप पडली होती.

एकदा असंच गप्पा मारत होतो तेव्हा तुला मी विचारलं होत की Rj समजा कधी कुणाशी मारामारी झाली आणि समोरच्या जवळ हत्यार असलं तर तू काय करणार? तेव्हा तू म्हणाला होता,"कुमार, अस कधी होणार नाही पण तशी वेळ चुकून आलीच तर मी पण back up plan ठेवतो.."याचा नेमका अर्थ काय हे मला काय कुणालाच त्यावेळी कळलं नव्हतं... योगायोग की काय त्याच आठवड्यात आधी ज्या टपोरी पोरांसोबत मारामारी झाली होती त्यांनी आपला रस्ता

अडवला होता, ते हाती सायकल चैन, लोखंडी रॉड घेऊन उभे होते अन तुझ्या चेहऱ्यावर मात्र हसू होतं... आम्हाला तर काहीएक समजत नव्हतं, तेवढ्यात तू गाडीवरून खाली उतरून सीटच्या आत ठेवलेली तलवार बाहेर काढली होती मग काय सर्वजण धूम ठोकून पळाले होते, तुझ्याकडे बघून आमचा तर आमच्या डोळयांवर विश्वासच बसला नव्हता...

तुझ्याशी गप्पा मारतांना असेच हाणामारी चे किस्से अन व्यायाम यावर चर्चा व्हायची, दिवसेंदिवस आपली मैत्री आणखी घट्ट होत गेली.. पदवीचे दोन वर्ष मस्त मौजमजा करत आणि मारामारी चे किस्से ऐकत जसे भर्रकन निघून गेले होते तर पदवीचे शेवटचे वर्ष...! तुझ्या जीवनात देखील कुणीतरी सोनेरी क्षण घेऊन आले होते, जेव्हा तू मला दोन तीन वेळा म्हणाला होता की काहीतरी महत्वाचं बोलायचं आहे पण योग्य वेळ येत नाहीये.. मला वाटलं होतं काहीतरी घरगुती समस्या असेल जरा वैयक्तिक, म्हणून तुला सांगायला जमत नाही...

तर असंच एक दिवस कॉलेज लेक्चर्स संपल्यावर तू म्हणाला होता,’’कुमार, आज ती वेळ आली, मला तुला काही सांगायचं आहे..’’त्यावर मी,’’बोल, काय म्हणतो Rj..’’

मी असं म्हटलं होतं तर तू म्हणाला होता की,’’कुठेतरी बाहेर, जरा शांत ठिकाणी जाऊ नंतर बोलू.’’

मग आपण गाडी घेऊन निघालो होतो, रस्ताच्या कडेला रसवंती चे दुकान सुरु होते उन्ह जर जास्तच तापलं होतं, आपण मस्त थंडगार सरबत प्यायलो होतो नंतर एका मंदिराच्या परिसरात बसून तू सांगितलं होतं,’’कुमार, नेमकं कसं सांगू आणि कुणाला सांगू हेच कळत नव्हतं, तु नेहमी सर्वांना समजून घेतो पण माझा विषय जरा वेगळा आहे, तु माझ्यावर हसणार नाही अन समजून घेणार म्हणून तुला सांगावं अस मी ठरवलं...’’इतकं बोलून तू थांबला होता, खरंतर तुझ्या या बोलण्यावरून मला अंदाज आला होता की कुणीतरी मुलगी तुला आवडली असणार पण एक गोष्ट अजून अशी की व्यायाम, बॉक्सिंग, मारामारी यांत नेहमी गुंतून राहणारा तु, तुला

अस काही वाटलं असेल का? जरावेळ माझा हा अंदाज चुकीचा असणार अस मला वाटलं होतं,''Rj, काय सांगायचं आहे? तु बिनधास्त बोल... तुला समजून घ्यायचा मी पूर्ण प्रयत्न करणार...''

तू जसं सांगितलं की तुला कुणीतरी मुलगी आवडते, मला माझा अंदाज पूर्णपणे बरोबर होता आणि तु हे काय सांगितलं या दोन्ही गोष्टीवर विश्वास बसायला जरा वेळ लागला होता तरी कसतरी स्वतःला सांभाळून मी तुला म्हटलं होत,''तुला हरकत नसेल तर मी तिचं नावं काय याचा अंदाज लावू का?''तु मला म्हटलं होतं,''कुमार, प्रयत्न करून बघ पण तुला ओळखता येईल असं वाटत नाही''

मी काही क्षण विचार केला होता,''आपली क्लासमेट... प्रेरणा..!''

माझं बोलणं ऐकून तुझा चेहरा अगदी बघण्यासारखा झाला होता, मला कळलं होतं की मी अचूक ओळखलं होतं... तेव्हा तू मला विचारलं होत की,''कुमार, तू कसं काय ओळखलं...''मी म्हटलं होत की,''असाच अंदाज लावला...''

तुझ्या चेहऱ्यावरचे हावभाव बघून माझं उत्तर तुला तितकंसं पटलं नव्हतं हे हि समजलं होतं, मग मी तुला विचारलं होतं की तुला ती कधीपासून आवडते? आणि मला नेमकं काय होतंय ते सांग तर खरं..! मग तू सांगितलं होतं की,''तसं काही सांगता येणार नाही की ती कधीपासून आवडते, आपला फ्रेंड्स ग्रुप बनला ना सुरुवातीला असंच मैत्रीचं नातं जुळलं जसं बाकीच्यांसोबत जुळलं... मग तिचं बोलणं, वागणं, इतरांना अभ्यासात मदत करणं, कधी जरा हसणं हे सगळं मनात कधी जपायला लागलो मला ही काहीएक कळलं नाही... हळूहळू तिचा स्वभाव, सहवास खूप हवाहवासा वाटत आहे... मी तर ठरवलं आहे की आधी तिला हे सांगायचं आहे पण कसं सांगायचं हे समजत नाही, तिला वाईट तर वाटणार नाही ना?

ती काय म्हणेल? तिला हे सांगायला पाहिजे की नाही? कुमार तुला काय वाटत? काय करावं अश्यावेळी?”

यावर मी फक्त मी इतकंच म्हणू शकलो होतो की,”तूच ठरव तुला काय करायचं आहे कारण मनात जी भावना आहे ती व्यक्त करायची आहे की आयुष्यभर तशीच ठेवायची आहे आणि वेळ घे, विचार करून निर्णय घ्यावा लागेल... तुला ती आवडते, पण तिच्या मनात काय आहे? हे केवळ तिलाच ठाऊक आहे आपण अंदाज पण लावू शकत नाही..”

“कुमार, मी तर तिला आयुष्यभऱ्याची साथ मागायची असं मनाशी पक्क केलं आहे, तिला मनातलं सांगून सावकाश निर्णय घे अस म्हणायचं आहे आणि पदवी पूर्ण झाली की नोकरी मिळवायची काही दिवस एकमेकांना समजून घेऊन काही वेळ घालवायचा आहे आणि करियर बनलं की लग्न करायचं आहे.”

“Rj, तू तर खूप दूरचा विचार करून ठेवल आहेस, आधी तुझं म्हणणं ऐकून जरा नवल वाटलं पण जेव्हा तु जीवनसाथी म्हणून तिची निवड केली, म्हणजे तुला ती खूप जास्त आवडते... तुझ्या आजच्या बोलण्याने मित्र म्हणून खूप नशीबवान असल्याचं वाटत आहे....”

“बरं कुमार, मग आता काय करायचं? तिला हे सर्व नेमकं कधी आणि कसं सांगायचं? तू काही मदत करु ना...."

“Rj अस काही अजून मी केलं नाही अनुभव अजिबात नाही, तर मला जरा वेळ दे, काय करता येईल ते बघतो आणि तुला सांगतो..”

“माझा निर्णय बरोबर होता की तूच मला समजून घेऊ शकतोस, थँक्स कुमार...”

“थँक्स काय म्हणत आहे? Rj आपण मित्र आहोत ना..”इतकं बोलून आपली चर्चा संपली होती मग आपण तुझ्या घरी जाऊन मस्त पैकी जेवण केलं होतं...

अस कुमारने लिहिलेलं वाचून ऋतुराज तो क्षण जणू एकदा पुन्हा जगला, भूतकाळशी एकरूप होऊन आठवणीत रमला अचानक त्याने डोळे मिटले जसकाही ते सर्व वाचलेलं त्याच्या नजरेसमोर त्याला दिसलं.. तो जुन्या आठवणीत हरवला, काही वेळाने वास्तवात परतून आला तर प्रश्नांनी त्याच्या मनात गर्दी केली... कसतरी त्या प्रश्नांना बाजूला सारत त्याने पुन्हा वाचायला सुरुवात केली... मध्येच कधी त्याला विचारांनी घेरले कधी भूतकाळात नव्याने प्रवास केला... रात्र सरत गेली तो सोनेरी क्षण जगत राहिला, चंद्र, चांदण्या आणि रात्रीच्या वेळी जे कुणी तेव्हा साक्षीदार त्याला लाभले त्या सर्वांच्या सहवासात ऋतुराज पहिल्यांदा वाचन करत जागला..!

# आधीच्या भागांविषयी ( शेकडो प्रतिक्रियांतून निवडक)

तुझं पुस्तक वाचलं. पुस्तक संपलं पण अजूनही मी पुस्तकातच अडकलो आहे. माझं जास्त पुस्तकांचं वाचन नाही, जी काही थोडी बहुत पुस्तके वाचलीत त्याच्याशी तुलनात्मक तुझं पुस्तक बघता मला जास्त फरक वाटला नाही. वाचत असतांना सुरवातीला मी आश्चर्यचकित राहिलो, ते यासाठी की तुझी शब्दांची मांडणी, लिहिण्याची शैली, पात्रांची ओळख, त्यांच्यातील संवाद, घटना क्रम आणि लिहित असतांना वाचकाच्या मनाचा केलेला विचार या सर्व गोष्टीचे भान ठेऊन लिहिले, हे अपेक्षेपेक्षा जास्त होते म्हणून.. तू जरी स्वतःला लेखक समजत नसेल पण तुझं पुस्तक वाचणाऱ्या प्रत्येकाला हि न पचणारी गोष्ट राहील, हे मात्र मी खात्रीने सांगू शकतो. हा लिखाणात उंच शिखर गाठण्याचा संकेत आहे. कहाणी जरी काल्पनिक असली तरी ती वास्तविकतेला धरून आहे. तुझ्या लेखनात दोन गोष्टी मला खूप प्रभावित करणाऱ्या राहिल्यात, एक म्हणजे घटना घडत असतांना आजूबाजूचे वातावरण तू खूप सुंदरतेने वर्णन केले आहे आणि दुसरी म्हणजे घटनेतून संदेश मांडत असतांना दिसून येत असलेली वाचनाची प्रदीर्घ सवय. या कहाणीतील दोन ओळी मनाला भिडणाऱ्या सुद्धा होत्या त्या म्हणजे, "रस्त्यावरील दिवे मनात येणाऱ्या विचारांसारखे एका मागून एक मागे जात होते" आणि "परिवारावर कठीण परिस्थिती ओढावते ती प्रत्येकाला मोठं होण्याची संधी उपलब्ध करून देते" या दोन ओळी जीवनातील सत्याचा उलघडा करतात. एका सच्च्या लेखकाची हीच ओळख असते कि तो जीवनाचे सत्य किती प्रभावीपणे मांडतो आणि तू त्या बिंदुला स्पर्श केला. त्यासाठी तुझं मनापासून अभिनंदन..

हा तर झाला लिखाणाचा विषय पण याहूनही मोठा विषय जो माझ्या, तुझ्या आणि आकाश च्या संदर्भात आहे व आपल्या व्यतिरिक्त तो इतर कोणालाच समजणार नाही. मित्र कोण आहेत या पेक्षा मित्र कशी आहेत हे महत्वाचे असते आणि माझे मित्र खरे आणि सच्चे आहेत याचा मला अभिमान आहे. आज आपल्या मैत्रीच्या पुस्तकात एक नवा पाठ जुळला. एक मित्र जो स्वतःचे पुस्तक प्रकाशित करतो ते केवळ प्रसिद्धीसाठी नाही तर त्या मागे त्याहूनही मोठा उद्देश हा असतो कि माझ्या मित्राने (भूषण ने) देखील त्याच्या लिखाणाला चालना देऊन ते जगापुढे आणावे आणि तो जर माझ्या प्रयत्नाते प्रभावित होत असेल तर नक्कीच त्याचे मनोबल वाढेल आणि प्रफुल तुझा उद्देश साध्य झाला. तुझ्या लिखाणाने मी प्रभावितच नाही तर प्रेरित सुद्धा झालो. त्यामुळे तुझे खूप खूप आभार..

सोबत एक विनंती सुद्धा. खरंतर माझं स्वार्थ त्यात आहे. तू तुझे लिखाण चालू ठेव आणि माझ्या सारख्यांना प्रेरित कर. पुन्हा तुझे खूप खूप अभिनंदन आणि त्याहूनही जास्त तुझे खूप खूप आभार.. उर्वरित भागाची आतुरतेने प्रतीक्षा..

ALL THE BEST..!

भूषण ढोके

Praful,


"मला काही सांगाचंय ..."

तुमची हि कादंबरी  तिचा पूर्वार्ध मला खूप आवडला. आता पर्यंत खूप  Emotional वाटला ... प्रत्येक वाक्य धुरकट नजरेनेच वाचला... कारण वाचताना अश्रू  थांबलेच नाहीत.

कृपा करून हया कादंबरीचा उत्तरार्ध मला पाठवा. ही तुम्हाला माझी नम्र विनंती.

Regards,

Valley



प्रिय, लेखक

आपली "मला काही सांगाचंय" (कादंबरी) वाचली. अप्रतिम अशी भाषाशैलीचा वापर आपण लिखाणात केला असुन कादंबरी वाचतांना पुढे काय? ही जिज्ञासा मनाला स्वस्त बसु न दिल्यामुळे आपल्या कादंबरीचा भाग-१ व भाग-२ वाचण्याची सुरवात केली ती संपत पर्यंत. परंतु सदर कादंबरी क्रमशः असल्यामुळे अत्यंत उत्सुकतेने भाग-३ ही कादंबरी शोधली. आपणाशी संपर्क केला असता कादंबरीचा भाग-३ लिहण्याचे काम सुरु असल्याचे एकूण मनाचा विरस झाला. असो..

कादंबरी वाचतांना काही भावना प्रसंगानुरुप मनाला स्पर्शुन गेल्या. जसे कादंबरीच्या सुरवातीलाच कुमार आपल्या प्रेयसीला वाढदिवसाच्या शुभेच्छा देतांना "तुला विसरणं किमान याजन्मी तरी शक्य नाही" कुमारचे हुदय स्पर्शी शब्द. नंतर कुमारचा अपघात, सुजितच्या मित्राचे आईला शहराकडे नेतांना हरपलेलं मन. कुमारचा अपघात झालेला एकून आईचा शोक, आणि विशेष म्हणजे कुमारच्या डायरीचं गूढ, इ.

आपण कादंबरीमध्ये कसदारपणे केलेले लेखन अत्यंत प्रशंसनीय आहे. मी अनेक कादंब-या वाचल्या परंतु या कादंबरीला प्रथमच प्रतिसाद देवून पुढेही आपले लिखान चालु ठेवावे, आयुष्यात उंच भरारी घ्यावी तसेच त्यांच्या प्रत्येक साहित्याच्या प्रकाशाला उजाळा मिळावा, ही मनापासून सदिच्छा.

भाग-३ च्या प्रतिक्षेत.....

वाचक ः

सौ.शालीनी काळे
यवतमाळ

तुम्ही लिहिलेल मला काही सांगाचंय पुस्तक वाचलं, खुप गूढ होतं पण समजलं. ह्या आधी खुप पुस्तक वाचली काही पुस्तकांणी हसवलं तर काहींनी रडवलं. तुमच्या पुस्तकाने दोन्ही एकदाचं करायला लावल, खुप छान आहे पुस्तक. मैत्री समजली, प्रेम सुद्धा समजलं. खर तर खरी मैत्री काय असते ते लिखानाच्या स्वरुपात आज समजलं. पुढील भाग येणार आहे का ? खुप ईच्छा आहे पुढील भाग वाचन्याची. धन्यवाद तुमच्या पुस्तकामुळे खुप गोष्टी शिकायला मिळाल्या...

रसिक वाचक

सुदर्शन खांडेकर

नमस्कार सर,

मी कालच तुमची "मला काही सांगायचंय" हि कादंबरी वाचली. फारच सुंदर आहे. सुरुवातीपासूनच उत्कंठा निर्माण होते की आता पुढे काय होणार. मी रात्री वाचायला सुरुवात केली अन् पुर्ण वाचून झाल्यावरच थांबलो. आता उत्सुकता आहे की उत्तरार्धात काय होईल याची. तरी मला उत्तरार्ध पाठवावा हि विनंती.

वाचक ,

रोशन इंदवे

प्रिय प्रफुल
आताच "मला काही सांगाचयं" वाचली.
कादंबरी लेखनाचा हा तुमचा पहिलाच प्रयत्न असला तरीही तो स्तुत्य आहे.
पुढे काय होईल याबाबतची वाचकाची उत्सुकता ताणून धरण्यात तुम्ही बऱ्यापैकी यशस्वी झाला असं म्हणायला हरकत नाही.
कादंबरीच्या उत्तरार्धाची वाट पहात आहे.
तरीही तुमचा हा पहिलाच प्रयत्न असल्याचं जाणवतं.
इथे तिथे काही चुका राहून गेल्यायंत. क्वचित् काही ठिकाणी तुमची बोली भाषा डोकावत असावी. काळ व व्याकरणाच्याही काही चुका जाणवल्या.
हे स्पष्टपणे सांगण्याच्या मागे तुम्हांला अधिक चांगलं लिहिण्यासाठी प्रवृत्त करणे एवढाच उद्देश आहे हे तुम्ही समजून घ्याल अशी अपेक्षा आहे.
तुम्हांस तुमच्या यापुढील साहित्यिक वाटचालीसाठी खूप शुभेच्छा आणि (वयाचा थोडा फायदा घेत)अनेकानेक उत्तम आशीर्वाद.
एक प्रामाणिक वाचक
ॲड्. शामकांत जोशी
नाशिक

तुम्ही लिहिलेल मला काही सांगाचंय पुस्तक वाचलं, खुप गूढ होतं पण समजलं. ह्या आधी खुप पुस्तक वाचली काही पुस्तकांणी हसवलं तर काहींनी रडवलं. तुमच्या पुस्तकाने दोन्ही एकदाचं करायला लावल, खुप छान आहे पुस्तक. मैत्री समजली, प्रेम सुद्धा समजलं. खर तर खरी मैत्री काय असते ते लिखानाच्या स्वरुपात आज समजलं. पुढील भाग येणार आहे का ? खुप ईच्छा आहे पुढील भाग वाचन्याची. धन्यवाद तुमच्या पुस्तकामुळे खुप गोष्टी शिकायला मिळाल्या...
रसिक वाचक
सुदर्शन खांडेकर

हॅलो **ई साहित्य**

मी अश्विनी अहिरे , बेलापूर नवी मुंबईहुन .

परवा जरा रिकामा वेळ मिळाला म्हणून सहजच काही तरी वाचावं असा मनात विचार आला , रोचज ते फेसबुक , व्हाट्सएप्प , आणि हॅलो वर वेळ घालवून कंटाळा आला म्हणून काही तरी वाचूया असा विचार करत होते पण काय वाचावं हा प्रश्न होता? प्रामाणिक पणे सांगायचं तर मी रेगुलर असं काही वाचत बसत नाही पण परवा कदाचीत " मला काही सांगायचं " ह्या कादंबरीचं पान देवाने माझ्या नशिबात लिहुन ठेवलं असावं आणि मी कधी हि काही फारसा काही न वाचणारी नेमकी त्या मला काही सांगायचं ह्या कादंबरीच्या प्रेमात पडले बगता बगता तीन दिवसात मी तिन्ही भाग वाचून पूर्ण केले आणि खरं सांगू तर मी स्वतःला त्यातलीच एक समजू लागले..अक्षरशः कथा वाचताना मी आकंठ त्यात बुडाले होते म्हणजे त्यातलं प्रत्येक पात्र माज्या डोळ्यासमोर उभं होत होता...प्रफुल शेजव यांचं लिखाण खरच कौतुकास्पद आहे त्या साठी त्यांना माझा सलाम ...आता आतुरता लागली आहे ती पुढच्या भागाची!!! काय घडलं पुढे ? कुमार ला बोलता येईल का ? कीर्तीप्रिया त्याला भेटेल का?? सुजित, प्रशांत , आकाश आर्यन ,ऋतुराज अनिरुद्ध , ह्यांना त्या डायरी बद्दल कळेल का ?जी अनिरुद्ध ने बघितली आहे आणि सगळं आता पुढे कसं जाणार हे समजण्याची उत्सुकता मनाला लागली आहे...तस्स मी लेखकाला प्रत्येक्ष फोन करून बोले आहे पण इथे मला ई साहित्य प्रतिष्ठान टीम याचे विशेष आभार मानायचे आहेत म्हणून मी हे लिहीत आहे ... **THANK YOU SO MUCH** तुम्ही हे आम्हाला मोफत उपलब्ध करून दिल्या बद्दल...बाकी काही नाही आता फक्त वाट बघायची पुढे काय होणार याची?

मला जे सांगायचं आहे ते झालं ...

कळावे , एक नवीन वाचक

अश्विनी अहिरे

**ई साहित्य प्रतिष्ठानचं हे तेरावं वर्षं.**

**प्रफ़ुल शेजव यांचं ई साहित्यवरचं हे पाचवं  पुस्तक.**

प्रफ़ुल शेजव हे अत्यंत अल्पावधीत लोकप्रिय झालेले लेखक. दोन वर्षांपुर्वी ऑगस्टच्या शेवटच्या आठवड्यात त्यांनी 'मला काही सांगाचंय" चा पहिला भाग प्रकाशनासाठी पाठवला. त्याला इतका जबरदस्त प्रतिसाद होता की बस्स. प्रत्येक वाचकाने एकच प्रश्न विचारला, "पुढे काय?" तेव्हा त्यांनी पुडले एक एक भाग लिहायला घेतले. आणि त्या प्रत्येक भागाला फ़ार मोठ्या प्रमाणावर वाच्कांचा प्रतिसाद मिळतो आहे.

प्रफ़ुलसारखे अनेक तरूण लेखक खूप छान लिहीत आहेत. मोठ्या लेखकांच्या तोडीस तोड आहेत. पण त्यांना योग्य असा प्लॅटफ़ॉर्म मिळत नाही. त्यांची पुस्तकं प्रकाशित करायला प्रकाशक धजावत नाहीत. कारण त्यांचे नाव प्रसिद्ध नसल्यामुळे त्यांच्या पुस्तकांची विक्री होईल की नाही याबद्दल प्रकाशक साशंक असतात. आणि जर या लेखकांची पुस्तके वाचकांसमोर आलीच नाहीत तर लोकांना त्यांचे नांव कळणार कसे? या दुष्टचक्रात सापडून अनेक तरूण लेखकांच्या पिढ्या बरबाद झाल्या.

पण आता असे होणार नाही. इंटरनेटच्या सहाय्याने नवलेखकांना वाचकांच्या नजरेपर्यंत पोहोचवण्याचे काम आता अनेक संस्था करत आहेत. ई साहित्य प्रतिष्ठान ही त्यातील एक.

सुमारे ५ लाखांहून अधिक वाचकांपर्यंत या नवीन लेखकांना नेण्याचे काम ही संस्था करते. पूर्ण विनामूल्य. लेखकांनाही कोणताही खर्च नाही. आणि आज ना उद्या लेखकांना भरघोस मानधन मिळवून देण्यासाठी ई साहित्य प्रतिष्ठानचे प्रयत्न चालू आहेत. नवीन लेखक यायला हवेत. भक्कमपणे उभे रहायला हवेत. त्यांना त्यांच्या त्यांच्या दर्जानुसार मानमरातब मिळावा. मानधन मिळावे. परदेशातील आणि सर्वदूर कानाकोपऱ्यातल्या खेड्यापाड्यांवरील नववाचकांना दर्जेदार साहित्य मिळावे. याच आमच्या प्रेरणा आहेत. नवनवीन ताकदवान लेखक ई साहित्याकडे वळत आहेत. त्यांना त्यांच्या कसानुसार प्रतिसादही मिळतो. कुणाला भरघोस तर काहींच्या वाट्याला टीकाही येते. या टीकेला positively घेऊन हे लेखक आपला कस वाढवत नेतात. सुरूची नाईक, प्रफ़ुल शेजव, भाग्यश्री पाटील, कोमल मानकर, सुरज गाताडे, अनूप साळगावकर, बाळासाहेब शिंपी, चंदन विचारे, सौरभ वागळे, यशराज पारखी, चंद्रशेखर सावंत, संयम बागायतकर, ओंकार झांजे, पंकज घारे, विनायक पोतदार, चंद्रकांत शिंदे, निरंजन कुलकर्णी, चारुलता विसपुते, कार्तिक हजारे, गणेश सानप, मनोज चापके, महेश जाधव, मनोज गिरसे, मृदुला पाटील, निलेश देसाई, सनहा पठाण, संजय बनसोडे, संजय येरणे, शंतनू पाठक, श्रेणिक सरडे, शुभम रोकडे, सुधाकर तळवडेकर, दिप्ती काबाडे, भूपेश कुंभार, सोनाली सामंत, केतकी शहा, विनिता

देशपांडे, सौरभ कोरगांवकर, मिलिंद कुलकर्णी, शुभम पाटील, आशिष कर्ले, सुरेंद्र पाथरकर, प्रीती सावंत दळवी, निमिष सोनार, उमा कोल्हे, गणेश ढोले, सचिन तोडकर, महेश पाठाडे, अभिजीत पैठणपगारे, कार्तिक हजारे, किरण दशमुखे, जगदिश खांदेवाले, माधुरी नाईक, विशाल दळवी, गौरी कुलकर्णी, जितेश उबाळे, प्रितम साळुंखे, प्रतिक म्हात्रे असे अनेक तरूण लेखक सातत्यपूर्ण लेखन करत आहेत. इंटरनेटवर हौशी मराठी लेखकांची कमी कधीच नव्हती. आता हौसेच्या वरच्या पायरीवरचे, लेखनाकडे गंभीरपणे पहाणारे आणि आपल्या लेखनाला पैलू पाडण्याकडे लक्ष देणारे तरूण लेखक येत आहेत. ही नवीन लेखकांची फ़ौज मराठी भाषेला नवीन प्रकाशमान जगात स्थान मिळवून देतील. त्यांच्या साहित्याच्या प्रकाशाला उजाळा मिळो. वाचकांना आनंद मिळो. मराठीची भरभराट होवो. जगातील सर्वोत्कृष्ट साहित्यिक प्रसवणारी भाषा म्हणून मराठीची ओळख जगाला होवो.

या सर्वात ई साहित्याचाही खारीचा वाटा असेल हा आनंद.

या यशात ई लेखकांचा सिंहाचा वाटा असेल याचा अभिमान.

बस्स. अजून काय पाहिजे?

टीम ई साहित्य प्रतिष्ठान